## काँग्रेस यूपीत पोटनिवडणूक लढवणार नाही

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २४:**
काँग्रेस उत्तर प्रदेशातील विधानसभा पोटनिवडणूक लढवणार नाही. पक्षाचे प्रदेश प्रभारी अविनाश पांडे यांनी गुरुवारी ही घोषणा केली. ते म्हणाले, पोटनिवडणुकीत काँग्रेस इंडिया आघाडीला पाठिंबा देईल.

यानंतर सपाने गाझियाबाद आणि खैर या जागांवरही आपल्या उमेदवारांची नावे जाहीर केली. सपाने यापूर्वीच ७ जागांसाठी उमेदवारांची नावे निश्चित केली होती. राज्यात १३ नोव्हेंबरला विधानसभेच्या ९ जागांसाठी पोटनिवडणूक होणार आहे. २३ नोव्हेंबरला निकाल लागणार आहे. उत्तर प्रदेशच्या पोटनिवडणुकीतून काँग्रेसने स्वतःला दूर ठेवले असून समाजवादी पार्टीला पूर्ण समर्थन दिले आहे.

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in
मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक १९८ * * नागपूर *
शुक्रवार, दिनांक २५ ऑक्टोबर २०२४
पुरवणीसह पाने ८
किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

अग्राग्रलेख **खरीखरी...**

## दुरितांचे तिमिर जावो

महाराष्ट्रात आगामी विधानसभेच्या निवडणुकीत मोठ्या मजेदार घटना घडणार आहेत. सर्वात आधी अशा प्रकारच्या घटनांची सुरुवात राष्ट्रवादीचे संस्थापक शरदचंद्र पवार आणि त्यांचे पुतणे अजित पवार यांच्या भांडणातून झाली. अजित पवार यांनी थेट आपल्या चुलत बहिणीसमोर आपल्या पत्नीला उभे केले. आता तर विधानसभेत अशा मजेदार लढाया होत आहेत की, त्यांच्याकडे पाहून आधुनिक काळात कुटुंब व्यवस्थेचे कसे आणि किती धिंडवडे उडाले आहेत. त्याचेच दर्शन होते. पन्नास वर्षांपूर्वी एकाच घरात पाच भाऊ असले आणि त्यांचे आपापसात कितीही पटत नसले. तरी त्या गोष्टी समाजासमोर किती टोकावर न्यायच्या. याचे त्यांना भान होते. गेल्या काही वर्षात आपली कुटुंब व्यवस्था पार उध्वस्त झालेली आहे. आज सख्ख्या बापालाही वृद्धाश्रमात जावे लागते. वृद्धाश्रमांचे जे उदंड पीक आलेले आहे. त्याचे पडसाद आता राजकारणातही उमटू लागलेले आहेत. सध्या जे उमेदवार जाहीर झालेले आहेत. त्यात मुलगी विरुद्ध बाप म्हणजे, मंत्री धर्मराव बाबा आत्राम विरुद्ध मुलगी भाग्यश्री आत्राम रिंगणात आहेत. तिकडे बारामती मध्ये शरद पवार यांचे पुतणे अजित पवार दादा यांच्याविरुद्ध अजितदादांचे पुतणे युगेंद्र पवार लढत आहेत. जे पवार कुटुंबीय आपल्या एकसंघ व एकोप्यासाठी प्रसिद्ध होते. त्या पवार कुटुंबातील 'वार' आता जगजाहीर झालेले आहेत. यासारखी अनेक उदाहरणे आज ठिकठिकाणी दिसत आहेत. काटोलच्या मतदार संघात अनिल देशमुख विरुद्ध त्यांच्या मुलालाच तिकडे उमेदवारी हवी आहे. आणखीही अशी जवळच्या नात्यागोत्यातील उमेदवारांची लढाई चार तारखेनंतर स्पष्ट होईल. राजकीय आकांक्षा असणे वाईट नाही. पण या राजकारणामुळे नात्यागोत्यांचा विसर पडणे. हे आपल्या सध्याच्या समाज व्यवस्थेला धरूनच आहे. मुलगा परदेशात गेला. म्हणजे मग त्याला देशात राहणाऱ्या आपल्या आई बापाची फारशी काळजी नसते. आता तर मुंबईसारख्या महानगरात अंत्यविधीची अंतिम क्रिया करण्यासाठीही कंपनी निघालेली आहे. थोडक्यात जी हवा समाजात पसरलेली आहे. तेच वारे आता समाजाच्या सर्व स्तरात पसरले आहे. मग त्यात राजकारणही आले. तिथेही अशी व्यवस्था पोहोचलेली आहे. या निवडणुकीत एकेक उमेदवार कोट्यावधीचा खर्च करणार आहेत. ही कोट्यावधींची कोटीच्या कोटी उड्डाणे कशी प्रसवतात. त्यावर आचार्य अत्रे जर आज हयात असते. तर त्यांनी मी मंत्री झालो, या नाटकानंतर एखादे झणझणीत नाटक लिहिले असते. सध्याच्या परिस्थिती कसेही करू सत्ता मिळवणे आणि ती सत्ता वैयक्तिकपणे मिळवणे याला प्रचंड महत्त्व आलेले आहे. एक शरदचंद्र पवार सोडले. तर इतर अनेक पन्नाशीच्या पुढील राजकारणी विशेष करून अजित पवार यांच्यासारखे नेते स्वतःला परप्रकाशित करून दिवस कंठण्याच्या बंधनात राहू इच्छित नाहीत. आपलेच काका आपल्याला 84 व्या वर्षीही आपल्या पंजाखाली ठेवू इच्छितात. त्याला वैतागून त्यांनी स्वतंत्र होण्याचा निर्णय त्याच त्राग्यातून घेतला असावा. असे आम्हाला वाटते. संयुक्त कुटुंब पद्धतीचे दिवस गेलेले आहेत. आता आपण कितीही थोपवून ठेवले तरी, महाराष्ट्रातील राजकारणात महत्त्व असलेल्या 60 ते 70 घराण्यांमध्ये हा कलह यापुढे दिसणार आहे. पंच्याहत्तरी पार केली की, त्यांनी राजकारण सोडावे. असा नियम मोदीजी यांनी केला आहे. पण त्यालाही अपवाद आहेतच जे वषार्नुवर्ष सत्तेत आहेत. ते गलितगात्र झाल्यावरही सत्तेचा त्याग करायला तयार नसतील. तर नव्या वातावरणाचे नवे प्रयोग असेच होत राहतील. सामान्य जनता त्याचीच मजा घेत राहील आणि तुम्ही-आम्ही असेच लिहीत आणि वाचत राहू. त्यातच आपण आपले समाधान मानावे आणि राजकारणाला दुरून नमस्कार करावा. शेवटी इतकेच सांगावेसे वाटते.

दुरितांचे तिमिर जावो, जो जे वांच्छील तो ते पाहो

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# काँग्रेस आणि शरद पवार राष्ट्रवादीची पहिली यादी आली

## दिग्गजांचे मतदारसंघ कायम

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :**
काँग्रेसने आज गुरूवारी त्यांच्या ४८ उमेदवारांची तर शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांच्या ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे.

महाविकास आघाडीमधील जागांचा तिढा काहीसा निवळला असल्याने आता काँग्रेस पक्षाकडून ४८ उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे.

साकोली विधानसभा मतदारसंघातून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले निवडणूक लढवणार आहेत. शुक्रवारी दिल्ली येथे काँग्रेस नेत्यांची बैठक होत असून, दुसरी यादी सायंकाळपर्यंत अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| अक्कलकुवा- ॲड. के.सी. पाडवी | नागपूर मध्य - बंटी शेळके | धारावी - डॉ. ज्योती गायकवाड |
| शहादा - राजेंद्रकुमार गावित | नागपूर पश्चिम - विकास ठाकरे | मुंबादेवी - अमीन अमीराली पटेल |
| नंदुरबार - किरण तडवी | नागपूर उत्तर - डॉ. नितीन राऊत | पुरंदर - संजय जगताप |
| नावापूर - श्रीकृष्णकुमार नाईक | साकोली - नानाभाऊ पटोले | भोर - संग्राम थोपटे |
| साक्री - प्रविण बापू चौरे | गोंदिया - गोपालदास अग्रवाल | कसबा पेठ - रवींद्र धंगेकर |
| धुळे ग्रामीण - कुणाल पाटील | राजुरा - सुभाष धोटे | संगमनेर - विजय थोरात |
| रावेर - ॲड. धनंजय चौधरी | ब्रह्मपुरी - विजय वडेट्टीवार | शिर्डी - श्रीमती प्रभावती घोगरे |
| मलकापूर - राजेश एकडे | चिमूर - सतीश वारजूकर | लातूर ग्रा. - धिरज देशमुख |
| चिखली - राहुल बोंद्रे | हदगाव - माधवराव पवार पाटील | लातूर शहर - अमित देशमुख |
| रिसोड - अमित झनक | भोकर - तिरुपती कोंडेकर | अक्कलकोट - सिद्धराम म्हेत्रे |
| धामणगाव रेल्वे - प्रा.वीरेंद्र जगताप | नायगाव - मीनल निरंजन पाटील | कराड दक्षिण - पृथ्वीराज चव्हाण |
| अमरावती - डॉ. सुनील देशमुख | पाथरी - सुरेश वरपुडकर | कोल्हापूर द. - रुतुराज पाटील |
| तेओसा - ॲड. यशोमती ठाकूर | फुलंब्री - विलास औताडे | करवीर - राहुल पाटील |
| अचलपूर - अनिरुद्ध देशमुख | मीरा भाईंदर - सय्यद हुसेन | हातकणंगले - राजू आवळे |
| देवळी - रणजीत कांबळे | मालाड प. - अस्लम आर. शेख | पलूस - डॉ. विश्वजीत कदम |
| नागपूर द. पश्चिम - प्रफुल गुडधे | चांदिवली - मो.आरिफ नसीम खान | जत - विक्रमसिंह सावंत |

## काका-पुतण्याचा बारामतीत सामना

- युगेंद्र पवारांचे अजितदादांना आव्हान
- पेठेंना निष्ठेचे फळ
- वाघमारेंनाही तिकीट
- अहेरीत बापबेटी सामना

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २४ :**
महाविकास आघाडीतील प्रमुख घटकपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने गुरुवारी सायंकाळी आपल्या ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली.



उमेदवारांची यादी : पान ८ वर

त्यात इस्लामपूर येथून पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, काटोल येथून राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख, घनसांगवी येथून माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, मुंब्रा- कळवा येथून पक्षाचे ज्येष्ठ नेते जितेंद्र आव्हाड व इंदापूर येथून हर्षवर्धन पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी येथे आयोजित एका पत्रकार परिषदेत आपल्या पक्षाच्या उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. पक्षाने बारामती विधानसभा मतदारसंघातून युगेंद्र पवार यांना उमेदवारी दिली आहे. या मतदारसंघात युगेंद्र पवार यांचा सामना त्यांचे चुलते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी होईल. त्यामुळे बारामतीत लोकसभा निवडणुकी प्रमाणेच हायव्होल्टेज लढत होणार हे स्पष्ट झाले आहे.

या यादीत विदर्भातीलही काही उमेदवारांचा समावेश असून, नागपूर पूर्व मधून पक्षाशी एकनिष्ठ राहिलेले दुनेश्वर पेठे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. येथे भाजपाचे कृष्णा खोपडे यांच्याशी त्यांचा सामना होईल.

अपेक्षेनुरूप काटोलमधून माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना उमेदवारी देण्यात आली असून, पाच दिवसांपूर्वीच शरद पवार गटात परतलेले राजेंद्र शिंगणे यांना सिंदखेड राजा येथून तर तुमसर मतदारसंघातून चरण वाघमारे यांना तिकीट देण्यात आले आहे.

## घड्याळ चिन्ह अजित पवार गटाकडे, पण...

### प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याचे बॅनर-पोस्टरमध्ये लिहावे लागणार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २४ :**
आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस 'घड्याळ' चिन्हाचा वापर करू शकते, मात्र निवडणुकीच्या बॅनर्स आणि पोस्टर्समध्ये हा वादाचा विषय असून न्यायालयात विचाराधीन असल्याचे लिहावे लागेल, असे सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार यांना गुरुवारी सांगितले.



शरद पवार गटाच्या याचिकेवर कोर्टात सुनावणी सुरू होती, त्यात अजित पवार गट न्यायालयाच्या आदेशाचे पालन करत नाही, त्यामुळे विधानसभा निवडणुकीत 'घड्याळ' चिन्ह वापरण्यापासून थांबवावे, असे म्हटले होते. तसेच अजित पवार गटाला नवीन चिन्हासाठी अर्ज करण्याची सूचना करावी.

खंडपीठाने अजित पवार गटानेही नवीन प्रतिज्ञापत्र दाखल करावे, असे निर्देश अजित पवार यांच्या वकिलांना दिले.

## पीएम मोदी ठोकणार ८ दिवस महाराष्ट्रात तळ

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २४ :**
महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली असून गुरुवारी अनेक दिग्गजांनी आपले उमेदवारी अर्ज भरले. २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी भरण्याची तारीख असून त्यानंतर प्रचाराला सुरुवात होणार आहे. महायुतीच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रात येणार आहेत. पंतप्रधान मोदींच्या राज्यात ८ सभा होणार आहेत.



पंतप्रधान नरेंद्र मोदी ७ ते १४ नोव्हेंबर महाराष्ट्रात तळ ठोकून असणार आहेत. या ८ दिवसांत ते विविध मतदारसंघात जाहीर सभा घेतील.

## इच्छुक उमेदवार म्हणून येणार अन् गेम करणार...

**जरांगेंना अतिरिक्त सुरक्षा**

■ **वृत्तसंस्था, जालना, दि. २४ :**
मराठा आंदोलन मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीत उमेदवार उभे करण्याची घोषणा केली आहे. इच्छुकांशी चर्चा करुनच उमेदवार निश्चित करणार असल्याचे जरांगे यांनी आधीच सांगितले आहे. दरम्यान, मनोज जरांगेंना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. इच्छुक उमेदवार म्हणून येणार आणि गेम करणार, अशी धमकी एका युट्युब चॅनलच्या कमेंटमधून दिली आहे.

युट्युबवरील एका चॅनलच्या कमेंटमध्ये बजाज बिश्नोई लीडर नावाच्या फेक अकाउंटवरुन ही धमकी देण्यात आली आहे. ऐन निवडणुकीत मनोज जरांगेंना धमकी मिळाल्याने एकच खळबळ उडाली आहे. या धमकीनंतर मनोज जरांगे यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली असून पोलिस बंदोबस्त वाढवला आहे. तसेच जरांगेंना भेटण्यासाठी येणाऱ्या सर्वांची तपासणी होणार असल्याचे समजते.

## भुजबळांच्या पुतण्याचा अजित पवारांना झटका


■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :**
मंत्री छगन भुजबळ यांचे पुतणे समीर भुजबळ यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसला जोरदार झटका दिला आहे. त्यांनी राष्ट्रवादीच्या मुंबई अध्यक्षपदाचा राजीनामा देत नांदगाव - मनमाड विधानसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे.



या ठिकाणी महायुतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे विद्यमान आमदार सुहास कांदे यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे समीर यांच्या भूमिकेमुळे महायुतीच्या पोटात गोळा उठला आहे.

## दाना चक्रीवादळाचा रेल्वेला फटका

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :**
पूर्व तटीय रेल्वे येथे ह्यदानाह्ण चक्रीवादळाच्या प्रभावामुळे अनेक प्रवासी रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या. भुसावळ विभागातून सुटणाऱ्या पाच गाड्यांचा त्यामध्ये समावेश आहे. रेल्वे गाड्यांमध्ये सध्या प्रवाशांची प्रचंड गर्दी आहे. ऐन सणासुदीच्या काळात रेल्वे गाड्या रद्द झाल्यामुळे प्रवाशांची प्रचंड अडचण होत आहे.



मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातून धावणाऱ्या गाड्यांवर चक्रीवादळाचा विपरीत परिणाम झाला. गांधीधाम - पुरी एक्सप्रेस गांधीधाम येथून २३ ऑक्टोबर रोजी सुटली नाही. लोकमान्य टिळक टर्मिनस - पुरी एक्सप्रेस २४ ऑक्टोबर रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून रद्द केली. पुरी - अजमेर एक्सप्रेस २९ ऑक्टोबर रोजी पुरी येथून रद्द असून, पुरी - गांधीधाम एक्स्प्रेस २६ ऑक्टोबर रोजी पुरी येथून रद्द झाली आहे. ब्रह्मपूर - उधना विशेष २५ ऑक्टोबर रोजी ब्रह्मपूर येथून रद्द करण्यात आली आहे. प्रवाशांनी नोंद घ्यावी, असे आवाहन मध्य रेल्वे प्रशासनाने केले आहे.

## राज्यभरात ५५२ उमेदवारांचे नामांकन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :**
महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ मतदारसंघात निवडणुकीकरिता नामनिर्देशन पत्र भरण्याचा आज तिसरा दिवस आहे. तिसऱ्या दिवशी म्हणजे २४ ऑक्टोबर २०२४ रोजी राज्यातून आजपर्यंत ५५२ उमेदवारांचे ७२० नामनिर्देशन पत्र दाखल झाली आहेत, अशी माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता १५ ऑक्टोबर २०२४ पासून लागू झाली असून २२ ऑक्टोबर २०२४ रोजी निवडणूक अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली. नामनिर्देशन पत्र भरणे सुरु असून २९ ऑक्टबरला नामनिर्देशन पत्र भरण्याची शेवटची तारीख आहे. या अजार्ची ३० ऑक्टोबरला छाननी करण्यात येऊन ४ नोव्हेंबर २०२४ रोजी अर्ज मागे घेता येईल. मतदान २० नोव्हेंबरला होत असून २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे.






महासागर




दिवाळी विशेषांक

- **राजकारण** : डॉ. भालचंद्र कांगो, भा. गा. वरखडे यांचे विश्लेषण
- **आरोग्य** : आरोग्यापुढचे धोके आणि वाढते अनारोग्य डॉ. सतिश सोनवणे, डॉ. अभिजीत वैद्य, डॉ. संपत केदारे, डॉ. कुंदन गायकवाड, प्रा. शिला गाडे, डॉ. राकेश शेट्टी यांची अत्यंत उद्बोधक माहिती.
- **पर्यावरण** : निसर्ग सूड उगवतो काय? डॉ. मधुकर पाचुलकर, पर्यावरण तज्ज्ञ, वैजयंती कुळकर्णी, पर्यावरण अभ्यासक, डॉ. किरण कुळकर्णी, पर्यावरण तज्ज्ञ यांची अभ्यासपूर्ण माहिती.
- **ग्राहक** : ग्राहकांना सावधान करणारा श्रीराम झंवर यांचा अभ्यासपूर्ण लेख

: मधल्या पिढीच्या समस्या : मेधा ईनामदार, स्वाती पेशवे

: मराठी गझलेतील नवी वळणे : गझलकार भुषण कटककर

४ वाचनीय कथा

: राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शंभरी : वासुदेव कुळकर्णी यांचा वाचनीय लेख

: मराठा आरक्षणाचा प्रश्न आणि रोजगाराचे संकट : वरिष्ठ पत्रकार मिलींद किर्ती यांचे विश्लेषण

**भरगच्च आणि दर्जेदार साहित्याचा नजराणा**

**आपल्या वितरकाकडे आजच मागणी नोंदवा.**

# कुरीअरमध्ये ड्रग्ज असल्याचे सांगून फसवणाऱ्या राजस्थानच्या टोळीचा पर्दाफाश

## पाऊणकोटीचा मुद्देमाल जप्त



**पिंपरी, दि. २४ : प्रतिनिधी**

अमली पदार्थ नियंत्रण विभागाचे पोलीस अधिकारी असल्याचे व कुरीअरमध्ये अमली पदार्थ मिळाल्याचे खोटे सांगून अटकेची भिती घालत फसवणूक करणाऱ्या राजस्थानच्या टोळीचा सायबर पोलिसांनी पर्दाफाश केला. चार जणांना अटक केली असून त्यांच्याकडून ७२ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मोहम्मद इलियास मोहम्मद सदिक कलाल (वय ३६, रा. लोसल, जि. सिकर, जयपूर, राजस्थान), मोहम्मद शाहिद अहमद अली (वय २५), पुरणसिंग रतन सिंग (वय २४), नाजील खत्री मन्वरअली खत्री (वय २९, तिघे रा. जोधपूर, राजस्थान) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. वाकड येथील एकाला आरोपींनी समाजमाध्यमातील व्हॉट्सअॅप टेलिग्रामद्वारे दृकश्राव्य संवाद पद्धतीने दूरध्वनी करुन फेडेक्स कुरीयरमधून बोलत असल्याचे सांगितले. मुंबई कस्टम विभागाला तुमच्या कुरीयरमध्ये शंभर ग्रॅम अमली पदार्थ मिळाले आहे. त्याला तुमचे नाव व आधार नंबर लिंक असल्याचे सांगितले. त्यासाठी मदतीच्या बहाण्याने अमली पदार्थ नियंत्रण विभागातून पोलीस अधिकारी बोलत असल्याचे भासवून संबंधित व्यक्तीला अटकेची भीती घातली. पडताळणी प्रमाणपत्राच्या नावाखाली विश्वास संपादन केला. त्यांना वेगवेगळ्या बँक खात्यात १२ लाख २२ हजार रुपये भरण्यास भाग पाडून त्यांची आर्थिक फसवणूक केली.

आरोपींनी गुन्ह्यासाठी वापरलेल्या बँक खात्यांपैकी एक खाते हे नाशिक येथील रिक्षा चालविणाऱ्याचे असल्याचे पोलिसांना समजले. त्यानुसार, नाशिक येथे पथक पाठवून तपास केला असता एका काळ्या रंगाच्या मोटारीतून एक जण येवून त्या व्यक्तीच्या खात्याची माहिती घेत बँक पासबुक, धनादेश बुक घेवून जात असल्याची माहिती मिळाली. त्यावरुन सखोल तपास केला असता जोधपूर, राजस्थान येथील काही जण पिसोळी, उंड्री भागात राहत असल्याबाबत तसेच त्यांच्याकडे काळ्या रंगाची मोटार असल्याची माहीती मिळाली. त्यानुसार, पथकाने पिसोळी येथील जगदंबा भवनजवळील एआरव्ही न्यु टाऊन सोसायटीतील एका सदनिकेत छापा टाकला. आरोपींकडून वेगवेगळ्या कंपनीचे १८ मोबाईल, ९० मोबाईल सिमकार्ड, एक लॅपटॉप, ६० बँक पासबुक किट, ६० एटीएम, डेबिट कार्ड, दोन पारपत्र, १५ आधार कार्ड, तीन पॅन कार्ड, तीन वाहन परवाना, १७०० रुपयांची रोकड व दोन मोटारी असा ७२ लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हे फसवणुकीच्या रकमेतून युएसडीटी मार्फत देशांतर्गत व परदेशात पैसे पाठवित असल्याची माहिती मिळाली आहे. त्यानुसार, अधिक तपास करणे, त्यांनी गुन्हा करण्यासाठी वापरलेले बँक खाते, त्यामधील व्यवहार, इतर साथीदारांकडे मिळून आलेला मुद्देमाल तसेच त्यांचा अशा प्रकारे किती गुन्ह्यात सहभाग आहे, याबाबतचा तपास पोलिसांकडून सुरु आहे.

# ठाण्यात आजपासून प्रचाराची रणधुमाळीला सुरुवात

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जितेंद्र आव्हाड, अविनाश जाधव अर्ज भरणार

**ठाणे, दि. २४ : प्रतिनिधी**

गुरुपुष्यामृत योग साधत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राष्ट्रवादी (शरद पवार गट) चे नेते जितेंद्र आव्हाड, मनसे नेते अविनाश जाधव हे उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. हे अर्ज दाखल करण्यापुर्वी तिन्ही पक्षांकडून शहरात मिरवणुका काढून जोरदार शक्तीप्रदर्शन केले जाणार आहे. आव्हाड यांचा अर्ज दाखल करण्यासाठी राष्ट्रवादी (शरद पवार) या पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हे तर, अविनाश जाधव यांचा अर्ज भरण्यासाठी मनसे प्रमुख राज ठाकरे हे उपस्थित राहणार आहेत. यामुळे गुरूवारपासून ठाण्यातील मतदार संघांमध्ये प्रचाराची रणधुमाळी सुरू होणार असल्याचे चित्र आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रातील कोपरी-पाचपखाडी मतदार संघातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे निवडणुक लढविणार असून त्यांच्याविरोधात महाविकास आघाडीकडून तुल्यबळ उमेदवार देण्याची तयारी सुरू आहे. या जागेची मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाने केली होती. परंतु शिवसेना (ठाकरे गट) या जागेसाठी आग्रही आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या जागा वाटपात ही जागा कोणत्या पक्षाला मिळणार आणि उमेदवार कोण असणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. असे असतानाच गुरुवार, २४ ऑक्टोंबर रोजी येणाऱ्या गुरुपुष्यामृत योग साधत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे उमेदवारी अर्ज दाखल करून प्रचाराला सुरूवात करणार आहेत. अर्ज भरण्यापुर्वी त्यांच्याकडून मिरवणुक काढली जाणार असून त्यात ते शक्ती प्रदर्शन करणार असल्याचे समजते.



कल्याण ग्रामीणमधील मनसेचे आमदार प्रमोद (राजू) पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या उदघाटनासाठी सोमवारी मनसे प्रमुख राज ठाकरे हे कल्याण ग्रामीण भागात आले होते. त्यावेळी त्यांनी कल्याण ग्रामीणमधून प्रमोद पाटील यांची तर, ठाणे शहरातून अविनाश जाधव यांची उमेदवारी घोषित केली. अविनाश जाधव हे सुद्धा गुरुवार, २४ ऑक्टोंबर रोजी येणाऱ्या गुरुपुष्यामृत योग साधत उमेदवारी अर्ज दाखल करणार असून यावेळी काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीत शक्ती प्रदर्शन करण्यात येणार आहे. तसेच जाधव यांचा अर्ज दाखल करण्यासाठी राज ठाकरे हे ठाण्यात येणार आहेत. कळवा-मुंब्रा विधानसभा मतदार संघातून राष्ट्रवादी (शरद पवार गट) चे नेते जितेंद्र आव्हाड हे चौथ्यांदा निवडणुक लढविणार आहेत. ते सुद्धा गुरुवार, २४ ऑक्टोंबर रोजी येणाऱ्या गुरुपुष्यामृत योग साधत उमेदवारी अर्ज दाखल करणार असून यावेळी त्यांच्या पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हे उपस्थित राहणार आहेत. अर्ज दाखल करण्यासाठी आव्हाड हे मुंब्रा भागात मिरवणुक काढून शक्ती प्रर्दशन करणार आहेत.

ठाणे शहर विधानसभा मतदार संघातून तिसऱ्यांदा उमेदवारी मिळालेले भाजपचे आमदार संजय केळकर हे वसुबारसचा मुहूर्त साधत सोमवार, २८ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० वाजता उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. या पुर्वी ते मिरवणुक काढून शक्तीप्रदर्शन करणार आहेत. असे असले तरी त्यांनी मंगळवारी दमाणी इस्टेटमधील दत्त मंदिरात दर्शन घेऊन प्रचाराला सुरूवात केली आहे. भाजपा घर चलो अभियानांच्या माध्यमातून प्रचार सुरू केला असून यामध्ये ४०० बुथवरील पदाधिकारी घरोघरी जाऊन केळकर यांची माहिती पत्रकांचे वाटप करणार आहेत.

गुरुवार, २४ ऑक्टोबर रोजी चंद्र संपूर्ण दिवस-रात्र पुष्य नक्षत्रात रहाणार असल्याने दुर्मिळ असा ' गुरुपुष्यामृत योग ' आला आहे. या दिवशी सकाळी सूर्योदयापासून ( सकाळी ६.३७ ) दुसऱ्या दिवशी सूर्योदयापर्यंत ( शुक्रवारी सकाळी ६.३७ ) हा योग आहे. गुरुपुष्यामृत योगावर सोने खरेदी करण्याची प्रथा आहे. मौल्यवान वस्तू खरेदी करण्याची परंपरा आहे. तसेच चांगल्या कामांचा प्रारंभ या दिवशी करण्याची प्रथा आहे, असे पंचांगकर्ते , खगोल अभ्यासक दा.कृ.सोमण यानी सांगितले.

# विधानसभा निवडणूकीत मतदान करण्यासाठी नवी मुंबईत विविध माध्यमांतून आवाहन

**नवी मुंबई, दि. :२४ : प्रतिनिधी**

20 नोव्हेंबर रोजी होणा-या महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीत नवी मुंबईतील प्रत्येक मतदाराने आपला मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन करण्याच्या दृष्टीने स्वीप अर्थात मतदार जागरूकता कार्यक्रमांतर्गत विविध माध्यमांचा वापर करण्यात येत आहे.

या अंतर्गत आज दिघा येथील नमुंमपा माध्यमिक शाळा क्र. 108 मध्ये विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्व सांगत त्यांच्यामार्फत आई-बाबा व कुटूंबिय आणि शेजारी यांना मतदान करण्याकरिता प्रोत्साहित करण्याचे सांगण्यात आले. तसेच नमुंमपा माध्यमिक शाळा क्र. 113, महापे येथेही मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो या विषयावर रांगोळी व चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांमार्फत मतदानाचा संदेश प्रसारित केल्याने त्यांना मतदानाचे महत्व कळतेच शिवाय त्यांच्यामार्फत त्यांच्या आईवडिलांपर्यंत तसेच परिचितांपर्यंत मतदानाचे कर्तव्य पार पाडण्याचा संदेश पोहचतो.

नेरूळ विभागात सेक्टर 29 येथील दैनंदिन बाजारामध्ये मतदार जनजागृती पथकाने भेट देत तेथील व्यावसायिक आणि ग्राहक यांच्याशी संवाद साधत त्यांना मतदानाचा हक्क बजावण्याविषयी सांगितले, तसेच याठिकाणी मतदान करणेबाबत सामुहिक शपथही ग्रहण करण्यात आली.



अशाच प्रकारे वाशी विभागात सेक्टर 15 ए येथील कर्मवीर भाऊराव पाटील अर्थात मॉडर्न महाविद्यालय वाशी येथे वर्गावर्गांमध्ये जाऊन युवकांशी संवाद साधण्यात आला व त्यांना मतदानाचे महत्व विशद करण्यात आले. पहिल्यांदाच मतदान करणा-या तरूणांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. त्यांच्यामार्फत त्यांच्या घरी तसेच परिसरातील व संपर्कातील नागरिकांनाही संविधानाने दिलेला मतदानाचा हक्क बजावण्याविषयी आवाहन केले जावे असे सूचित करण्यात आले. वाशी हायवे बसथांब्यावरील प्रवाशांमध्येही मतदानाविषयी जनजागृती करण्यात आली. उद्यानांमध्ये जॉगींगसाठी येणा-या नागरिकांसह तेथील कर्मचा-यांसह मतदानाविषयी शपथ घेण्यात आली.

त्याचप्रमाणे नेरूळ, वाशी व तुर्भे विभाग कार्यालयांमधील कर्मचारी तसेच विभाग कार्यालयांना भेट देणारे नागरिक यांनी एकत्रितपणे मतदानाची शपथ ग्रहण केली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने स्वीप कार्यक्रमांतर्गत नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत आहे. यामध्ये नमुंमपा क्षेत्रातील 150 व 151 या दोन विधानसभा मतदारसंघाकरिता ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नियुक्त स्वीप नोडल अधिकारी अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली बेलापूर विधानसभा मतदार संघाचे स्वीप नोडल अधिकारी तथा वाशीचे विभाग अधिकारी श्री.सागर मोरे व ऐरोली विधानसभा मतदार संघाच्या स्वीप नोडल अधिकारी तथा उपआयुक्त श्रीम.अभिलाषा म्हात्रे–पाटील यांच्या माध्यमातून मतदार जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये शिक्षण विभागाच्या उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे, नेरूळ विभाग अधिकारी जयंत जावडेकर, तुर्भे विभाग अधिकारी प्रबोधन मवाडे, दिघा विभाग अधिकारी भरत धांडे, कोपरखैरणे विभाग अधिकारी सुनिल काठोळे यांनीही आपल्या सहकारी अधिकारी, कर्मचारी यांच्यासह सहभाग घेतला.

# संशयास्पद वाटले तर लगेच जप्ती!

## निवडणुकीसाठी पालिका आयुक्तांच्या तपास यंत्रणांना सूचना

**नवी मुंबई, दि. २४ : प्रतिनिधी**

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई शहर व उपनगरात कायदा व सुव्यवस्था तसेच आर्थिक प्रकरणांशी संबंधित सर्व तपास व अंमलबजावणी यंत्रणांनी चोख जबाबदारी पार पाडावी. त्यासाठी पैशांची देवाणघेवाण, मादक द्रव्य, तस्करी, तसेच हवाला आदी संशयास्पद प्रकरणांत कोणतीही हयगय न करता थेट व तात्काळ जप्तीची कारवाई करावी, अशा सूचना जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी दिल्या आहेत.

विधानसभा निवडणूक अनुषंगाने संबंधित यंत्रणांची महानगरपालिका मुख्यालयात मंगळवारी बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सर्व यंत्रणांकडून निवडणुकीबाबतचे नियोजन, तसेच सुरू असलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला.

**सीमेवर लक्ष ठेवा**

सर्व यंत्रणांनी संयुक्त पथकांची निर्मिती करून त्यांची मुंबईतील 'चेक पोस्ट'वर नियुक्ती करावी. मुंबईच्या सीमेवर, समुद्र किनाऱ्यांवर, विमानतळ तसेच वाहतुकीच्या अन्य मार्गांवरील हालचालींवर बारीक लक्ष ठेवून संशयास्पद प्रकरणांमध्ये तत्काळ कारवाई करावी. भारतीय विमानतळ प्राधिकरणाने 'नॉन शेड्यूल्ड फ्लाइट्स' संदर्भातील माहिती मुंबई पोलिस तसेच आयकर विभागाला नियमितपणे द्यावी, तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) स्वतंत्र नियंत्रण कक्ष स्थापन करावे, असेही गगराणी यांनी यावेळी यंत्रणांना सांगितले.

**कोणाला मिळाल्या सूचना?**

पालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत आयकर विभाग, राज्य उत्पादन शुल्क, सक्तवसुली, महसूल गुप्तवार्ता, केंद्रीय व राज्य वस्तू व सेवा कर, सीमा शुल्क, अमली पदार्थ नियंत्रण, वित्तीय गुप्तवार्ता विभाग, तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, तटरक्षक दल, रेल्वे सुरक्षा दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, भारतीय विमानतळ प्राधिकरण, नागरी उड्डाण सुरक्षा, परिवहन विभाग, आचारसंहिता कक्ष, मुंबई पोलिस दलाचे कायदा व सुव्यवस्था विभाग, राज्यस्तरीय बँकर्स समिती यांच्यासह विविध यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

# लोकलमधून पडून महिलेचा मृत्यू

**ठाणे, दि. २३ : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या अंबरनाथ आणि बदलापूर दरम्यान कर्जत लोकलमधून पडून एका महिला प्रवाशाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. मंगळवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास अंबरनाथ स्थानकातून निघालेल्या कर्जत लोकलमधून ही महिला प्रवासी प्रवास करत होती. गर्दीमुळे महिलेला डब्यात शिरता आले नाही, त्यामुळे महिला प्रवासी लोकलमधून पडली, अशी माहिती रेल्वे स्थानक प्रशासनाने दिली आहे. सायंकाळच्या सुमारास जवळपास सर्वच लोकल गाड्या कल्याणहून कर्जत आणि कसाराच्या दिशेने उशिराने धावतात.

अंबरनाथ स्थानकातून सायंकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी कर्जत लोकल सुटते. मंगळवारी ही लोकल सुमारे २५ ते ३० मिनिटे उशिराने धावत होती. आठ वाजण्याच्या सुमारास ही लोकल अंबरनाथ स्थानकातून निघाली. अंबरनाथ बदलापूर स्थानक दरम्यान गर्दीमुळे ऋतुजा गणेश जंगम या लोकलमधून खाली पडल्या अशी माहिती रेल्वे पोलीसांनी दिली आहे. याची माहिती मिळताच रेल्वे पोलिसांनी तात्काळ त्यांना उल्हासनगरच्या शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथे त्यांना मृत घोषित करण्यात आले.

# मोटारीच्या धडकेत महापालिकेतील सफाई कामगार महिलेचा मृत्यू

**पुणे, दि. २४ : प्रतिनिधी**

मोटारीच्या धडकेत पदपथावरील गवत काढणाऱ्या सफाई कामगार महिलेचा मृत्यू झाल्याची घटना मुंढवा-खराडी रस्त्यावर घडली. याप्रकरणी चंदननगर पोलिसांनी मोटार चालकाला अटक केली.

राजेंद्र ज्ञानोबा धुमाळ (वय ५२, रा. रायकर मळा, धायरी) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे छाया मंगेश पेंढारकर (वय ३९, रा. खराडी) असे अपघातात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत ज्योती लोखंडे (वय ३७, रा. हडपसर) यांनी फिर्याद दिली आहे. सोमवारी (२१ ऑक्टोबर) सकाळी अकराच्या सुमारास मुंढवा पुलाकडून खराडी गावाकडे येणाऱ्या रस्त्यावर ही घटना घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, पेंढारकर या महापालिकेत कंत्राटी पदावर सफाई कर्मचारी म्हणून काम करतात. सोमवारी सकाळी त्या त्यांच्या सहकारी छाया यांच्यासह खराडीतील रस्त्यावर गवत काढण्याचे काम करत होत्या. त्या वेळी भरधाव मोटारीने छाया यांना धडक दिली. अपघातात गंभीर जखमी झालेल्या छाया यांचा उपचारांपूर्वीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच चंदननगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत घेतली. पोलिसांनी मोटार चालक धुमाळ याला अटक केली असून, सहायक पोलीस निरीक्षक मुबारक शेख तपास करत आहेत.

**Format C-7**

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.

(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**

***Name of the Election : Maharashtra Legislative Assembly-2024**

**Name of State/UT : Maharashtra**

**(1) Name of the Constituency : 53 - South Nagpur**

**Name of the candidate : MOHAN GOPALRAO MATE**

| Sl. No. | | | |
|---|---|---|---|
| 1 | **Criminal antecedents** | | |
| | a. | Nature of the offences | 1) It is alleged that I had asualted complainant.<br>2) Application for Maintenance is pending against me. |
| | b. | Case no. | 1) F.I.R. No.140/1993, u/s. 326 of IPC with Kotwali PS<br>2) Cri. M. A 5047/2023, u/s. 125 (3) of Cr PC |
| | c. | Name of the Court | 1) J.M.F.C. Court No. 8, Nagpur<br>2) 13th Jt. C.J.J.D. Nagpur |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | 1) No<br>2) No |
| | e. | Date of conviction, if any | Nil |
| | f. | Details of punishment undergone, if any | Nil |
| | g. | Any other information required to be given | The cases are still under consideration before the Hon'ble Court. |
| 2 | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | | Candidate **Mohan Gopalrao Mate** is Senior Legislator. He has very strong administrative capacity. Looking at his experience he has been chosen. |
| 3 | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

**(2) Name of the Constituency : 53 - South Nagpur**

**Name of the candidate : MOHAN GOPALRAO MATE**

* In the case of election to Council of States or States or Election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of Constituency.

Signature of office bearer of the Political Party

Name and designation...

**Chandrashekhar Bawankule**

**President,**

**Bharatiya Janata Party, Maharashtra**

# काँग्रेसच्या प्रदेश सचिव जयश्री शेळके यांनी उमेदवारीसाठी बांधले शिवबंधन

### शिंदेसेनेकडून संजय गायकवाड, संजय रायमुलकरांना उमेदवारी



■ **महासागर प्रतिनिधी,**

बुलडाणा, **दि. २३ :** शिंदेंच्या शिवसेनेने २२ ऑक्टोबर रोजी रात्री जाहीर केलेल्या उमेदवारांमध्ये बुलडाणा मतदारसंघाचे विद्यमान आ. संजय गायकवाड व मेहकरचे आ. डॉ. संजय रायमुलकर यांचे नाव घोषित केले. मात्र, उबाठाने आज २३ ऑक्टोंबर रोजी जाहीर केलेल्या ६५ नावांमध्ये फक्त मेहकर विधानसभेची उमेदवारी सिध्दार्थ खरात यांना जाहीर केली आहे. दुसरीकडे काँग्रेसच्या प्रदेश सचिव जयश्री शेळके यांनी उबाठात प्रवेश केला आहे. उध्दव ठाकरे यांनी त्यांना एबी फॉर्म देखील दिला आहे. पुढच्या यादीत त्यांचे नाव जाहीर होणार आहे, असे सांगितले जाते. शेळकेंनी अचानक मशाल हाती घेतल्याने मतदारसंघात उलटसुटल चर्चेला उधाण आले आहे.बुलडाणा विधानसभा मतदारसंघासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवार म्हणून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्याकडून जयश्री सुनील शेळके यांची उमेदवारी या प्रवेशामुळे निश्चित मानली जात आहे. आज बुधवारी सायंकाळी ६ वाजता मुंबईत मातोश्रीवर त्यांनी शिवबंधन बांधले. उर्वरित, पक्षश्रेष्ठींच्या सुचनेनुसार बैठक होईल जयश्री शेळके या काँग्रेसमधून उबाठा गटात गेल्यामुळे काँग्रेस पक्षश्रेष्ठी त्याबाबत काय सूचना देतील, त्याचे पालन करु. त्या महाविकास आघाडीतच असल्याने भूमिका मदतीचीच राहणार आहे. महाविकास आघाडी अभेद्य आहे. - दत्ता काकस, शहराध्यक्ष, उबाठा.

पक्षप्रवेश करत असतानाच एबी फॉर्म दिला हातात जयश्री शेळके यांनी उबाठात प्रवेश केला असून त्यांनी हाती शिवबंधन बांधताच उमेदवारीचा एबी फॉर्म सुध्दा त्यांना देण्यात आल्याची माहिती शिवसेना उबाठाचे जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवंत यांनी दिली.

**मोबाइल टॉवर बंद**

### झाल्यामुळे उमरा परिसरात नागरिक त्रस्त

**उमरा :** गावात मोबाइल टॉवर उभे मात्र रेंजच नसल्याने टॉवर गावाला अन् रेंज नाही नावाला...' अशी अवस्था उमरा व परिसरातील मोबाइल धारकांची झाली आहे. याबाबत परिसरालगतच्या सुमारे सहा गावांचे व्यवहाराचे केंद्र म्हणून उमरा गाव ओळखले जाते. मात्र, गेल्या काही तासांपासून मोबाइलचे अचानक नेटवर्क जाणे, फोन सुरू असताना अचानक कट होणे. फोर-जी सेवा असली तरी टू-जीचीसेवा मिळणे, शेजारी-शेजारीफोन असताना फोन न लागणे अशा अनेक कारणांमुळे सर्वच मोबाइलधारकांना त्रास सहन करावा लागत आहे यामध्ये बीएसएनल या सरकारी कंपनीचे नेटवर्कही अपवाद नाही. सध्याच्या काळात मोबाइलशिवाय जगणे कठीण बनले आहे. नागरिक त्यांच्या सोईनुसार विविध मोबाइल कंपन्यांची सिमकार्ड वापरतात. मात्र, अलिकडे मोबाइल कंपन्यांच्या सदोष सेवेमुळे सर्वच कंपन्यांचे ग्राहक त्रस्त झाले आहेत. प्रत्येक मोबाइल कंपनीच्या ग्राहकाला विचारल्यानंतर काहींना काही तक्रार असल्याचे आढळून आले आहे. परिसरातील अनेकांशी संपर्क साधल्यानंतर मोबाइल कंपन्यांकडून दिल्या जाणाऱ्या सेवांचा नागरिकांनी पाढाच वाचून दाखवला.

# एक जण बसला नियमित अध्यक्षांच्या कक्षात, दुसरा व्यवस्थापकाच्या कक्षात

### अपात्रतेच्या निर्णयाला सहकार मंत्रालयाकडून स्थगिती



■ **महासागर प्रतिनिधी,**

**अकोला, दि. २३ :**अकोला जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदावरून वाद सुरू झाल्याचे बुधवारी दिसून आले. अध्यक्षांसह दोन संचालकांना अपात्र ठरवण्याचे प्रकरण थेट सहकार मंत्र्यांपर्यंत पोहोचल्यानंतर मंत्रालयालयाकडून आदेश जारी झाला आहे. अपात्रतेच्या निकालाला स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे यापूर्वीचे अध्यक्ष शशिकांत गायकवाड यांनी पदावर दावा करत ते अध्यक्षाच्या कक्षात बसले. पूर्वीचे अध्यक्ष नीलेश काळे यांनी आपली निवड प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेल्या सभेत बहुमताने झाल्याचा दावा करत आपणच अध्यक्ष असल्याचे म्हणत व्यवस्थापकाच्या कक्षात बसले. दोघांनी दोन कुलूपे आणली. आता जिल्हा उपनिबंधक कोणती कार्यवाही करतात, हे पाहणे औत्सुक्याचे राहणार आहे. दोन वर्षापूर्वी झालेल्या शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या निवडणुकीत सत्तांतरण झाले. शिक्षकांच्या दिग्गज संस्थांनी एकत्र येत सत्ता स्थापन केली. दरम्यान तीन जणांच्या अपात्रतेबाबतचे प्रकरण जिल्हा उपनिबंधकांकडे पोहोचले होते. पतसंस्थेचे अध्यक्ष शशिकांत गायकवाड (संचालक म्हणून) यांच्यासह संचालक मारोती वरोकार आणि ज्ञानेश्वर टोहरे यांना अपात्र करण्यात आले होते. या आदेशाला विभागीय सहनिबंधकांकडे आव्हान दिले होते. सहनिबंधकांनी अंतरिम स्थगिती दिली होती. मात्र नंतर त्यांनी हा स्थगिती आदेश पुढे कायम करण्यात येत नाही, असे ३९ मे रोजीच्या आदेशात नमूद केले होते. त्यामुळे अध्यक्ष व संचालकांनी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली होती. नंतर माझी अध्यक्षपदावर सहकार विभागाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून घेण्यात आलेल्या सभेत करण्यात आली. त्यामुळे मी अध्यक्षपदी कायम आहे. माझी निवड सर्व संचालकांकडून झाली. अध्यक्ष या नात्याने मला कामकाज करण्याचा अधिकार आहे. -नीलेश काळे, यापूर्वीचे अध्यक्ष अध्यक्ष शशिकांत गायकवाड यांनी अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारत कक्षात बसले. त्यांच्यासोबत संचालक देवानंद मोरे यांच्यासह अन्य सभासद होते. तर नीलेश काळे हे व्यवस्थापनाच्या कक्षात बसले. याठिकाणी संचालक प्रमोद काळेपांडेही होते.

मी सहकार मंत्र्यांकडे याचिका दाखल केली होती. अध्यक्षपद बहाल करण्यासह अर्ज मंजूर करण्याची मागणी केली. हा अर्ज मंजूर करून यापूर्वीच्या निकालांना स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे मी अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला आहे. -शशिकांत गायकवाड, अध्यक्ष तक्रार आल्यास कार्यवाही जि.प. प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्ष, संचालक पदाबाबतच्या नव्याने कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच नवीन आदेशाची प्रतही मिळालेली नाही. तक्रार, आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**-डॉ. प्रवीण लोखंडे, डीडीआर**

# विविध आर्थिक व्यवहारांवर करडी नजर ठेवा-निशांत के




■ **महासागर प्रतिनिधी,**

**अकोला, दि. २३ :** विधानसभा निवडणुकीत कुठेही गैरव्यवहार व आचारसंहितेचे उल्लंघन होऊ नये यासाठी सर्व पथकांनी सजग राहून समन्वयाने कामे करावीत. विविध माध्यमांतून होणाऱ्या खर्च व आर्थिक व्यवहारांवर करडी नजर ठेवा व तपासण्यांत सातत्य राखा, असे निर्देश निवडणूक खर्च निरीक्षक निशांत के. यांनी बुधवारी दिले. त्यांनी निवडणूक यंत्रणेचा आढावा घेतला.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने खर्च निरीक्षक निशांत के. अकोल्यात दाखल झाले असून, त्यांनी नियोजन भवनात आढावा घेतला. बैठकीला जिल्हाधिकारी अजित कुंभार, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी वैष्णवी बी., पोलिस अधीक्षक बच्चन सिंह, महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने, अपर जिल्हाधिकारी रामदास सिद्धभट्टी, उपजिल्हाधिकारी महेश परंडेकर यांच्यासह सर्व नोडल अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदार संघामध्ये निवडणूक निर्भय आणि पारदर्शक वातावरणात पार पडण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी प्रामाणिकपणे व सदैव दक्ष राहून पार पाडावी, असे निरीक्षक निशांत के. म्हणाले. बँकांमध्ये होणारे दैनंदिन व्यवहार, संशयास्पद व्यवहारांवर विशेष लक्ष द्यावे.

निवडणूक काळात प्रलोभन दाखविण्यासाठी साड्या, मद्य, वस्तू, पैसे यांचा वापर केला जाऊ शकतो. त्यामुळे सजग राहून अशा बाबींना तत्काळ निर्बंध घालावा व संबंधितांवर कारवाई करावी. उमेदवाराकडून प्रचारासाठी केल्या जाणाऱ्या प्रत्येक खर्चाची काटेकोरपणे नोंद घ्यावी.

निवडणूक आयोगाच्या निर्देश व सूचनांचा कुठेही भंग होणार नाही याची दक्षता सर्वांनी घ्यावी, असेही निर्देश खर्च निरीक्षकांनी दिले.

# चक्रधर स्वामी यांची मानवतावादी चळवळ पुढे न्या-डॉ. अशोक राणा



■ **महासागर प्रतिनिधी,**

**अमरावती, दि. २३:** समाजात समता,स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता रुजवायची असेल तर चक्रधर स्वामींची मानवतेची चळवळ पुढे नेली पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. अशोक राणा यांनी केले.

सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी सामाजिक विचार प्रबोधन अभियान तसेच भारतीय महाविद्यालयाच्या संयुक्त सहकार्याने सर्वज्ञ चक्रधर स्वामीचे सामाजिक समतेविषयक कार्य व विचार-काल,आजआणि उद्या' या विषयावरील आयोजित चिंतन व्याख्यानात ते बोलत होते.

भारतीय महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.अविनाश आवलगावकर होते तर अध्यक्षस्थानी भारतीय महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. आराधना वैद्य होत्या. याप्रसंगी भारतीय महाविद्यालय मराठी विभागाच्यावतीने मराठी भाषा व वाङ्मय अभ्यास मंडळाचे उदघाटन झाले. प्रा. डॉ. मीता कांबळे मराठी विभाग प्रमुख यांनी तशी घोषणा केली. यावेळी राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे पारितोषिक वितरणही करण्यात आले. महाविद्यालयीन गटातून अपूर्वा लवणकर, तृप्ती कांडलकर, गुंजन टवले, तनुजा मनगटे तर खुल्या गटातून वैशाली बनसोड, ईश्वरी कोहळे, विद्या परांजपे, साक्षी कळसाईत यांना पुस्तकांचा संच देऊन सन्मानित करण्यात आले. इतर विजेत्यांना सर्वज्ञ ज्ञानप्रबोधन मंडळ, राऊळ माय राऊळ बाप पारायण मंडळ, सर्वज्ञ सेवा महिला मंडळ, अखिल भारतीय भोपे परिषद, कै. शंकरराव चर्जन स्मृती प्रतिष्ठान या संस्थांनी पुरस्कृत केले. या संस्थांतर्फे दोन्ही गटात अनुक्रमे ३०००, १५००, ९०००, ५००रु. किंमतीची पुस्तके भेट देण्यात आली.

पंचकृष्ण प्रबोधन परिषद जाळीचा देव अंतर्गत घेण्यात आलेल्या सामान्य ज्ञान स्पर्धेत प्रतिभा चक्रधर भुगुल यांचा राज्यातून तिसरा क्रमांक आल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

या वेळी आम्ही भारतीय - जनसांस्कृतिक चळवळ महाराष्ट्रचे राज्य समन्वयक डॉ. प्रकाश मानेकर, प्रा.डॉ. कल्पना मेहरे, प्रा.डॉ. मिता कांबळे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा.संदीप तडस, संचालन प्रफुल्ल कुकडे तर आभार प्रा. संजय चोपडे यांनी मानले. याप्रसंगी सर्व क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

**अल्पसंख्यकांचा सत्कार :** अनुसूचित जमाती मधून मनीषा मडावी, दिव्या मडावी अनुसूचित जाती मधून प्रज्ञा गजभिये, अल्पसंख्याक मधून मो. माहीर कुरेशी, अलीना सदफ शहा, आनम शेख, इतर मागासवर्गीय गटातून अविनाश राजगुरे दिव्यांग ऋतुजा पंजाबी, निबंध स्पर्धेचे परीक्षक यांचा विशेष सत्कारही या वेळी केला. या वेळी नागरिकांसह विद्यार्थी, विद्यार्थिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती, अशी माहिती आयोजकांच्या वतीने कळवण्यात आली आहे.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **SONALI PRAVIN HADOLE.** NOW MY NEW NAME IS **SONALI GOPALKRUSHNA WALKE.**
**ADD :** PLOT NO 29 ARYA NAGAR KORADI ROAD NAKA NO 1 MANKAPUR NAGPUR 440030 MS.

MY OLD NAME WAS **SONALI HADOLE.** NOW MY NEW NAME IS **SONALI GOPALKRUSHNA WALKE.**
**ADD :** PLOT NO 29 ARYA NAGAR KORADI ROAD NAKA NO 1 MANKAPUR NAGPUR 440030 MS.

MY OLD NAME WAS **MOHAMMAD AAMIR.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD AAMIR SHEIKH.**
**ADD :** BHOSA ROAD SHADAB BAG YAVATMAL 445001 MS.

MY OLD NAME WAS **ANISHAA NAVEEN MANKE.** NOW MY NEW NAME IS **ANEESHA NAVEEN MANKE.**
**ADD :** PLOT NO 35/A NARMADA LAYOUT BHUPESH NAGAR NEAR ASIATIC SCHOOL BORGAON KATOLROAD NAGPUR 440013 MS.

MY OLD NAME WAS **HASHAM NAVEED.** NOW MY NEW NAME IS **NAVEED HASHAM.**
**ADD :** BEHIND POLICE LINE TAKLI NEAR SHADAAB APPT PENSION NAGAR NAGPUR 440013 MS.

**Format C-7**

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.

(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**

***Name of the Election : Maharashtra Legislative Assembly-2024**

**Name of State/UT : Maharashtra**

**(1) Name of the Constituency : 52 - Nagpur South-West**

**Name of the candidate : DEVENDRA GANGADHAR FADNAVIS**

| Sl. No. | | | |
|---|---|---|---|
| 1 | **Criminal antecedents** | | |
| | a. | Nature of the offences | 1. Allegation that I have directed to open accounts of government employees in Axis Bank using my position to favour my wife.<br>2. Allegation that I had given letter to NIT to cancel reservation on the plot of respondent and to give demand note.<br>3. Allegation that I did not mention two (2) Criminal cases pending against me in affidavit along with my nomination form.<br>4. Allegation that I had given interview which was false and thereby allegedly committed contempt of court. |
| | b. | Case no. | 1. Cri. W. P. No.734/2019 (Now Cri. P.I.L. No. 5/2019)<br>2. Cri. W.P. No. 593/2024<br>3. Criminal Revision No. 310/2014<br>4. C.A. No. 411/2019 in Criminal Revision No. 94/16 |
| | c. | Name of the Court | 1. Before Hon'ble High Court of Bombay Nagpur Bench Nagpur<br>2. Before Hon'ble High Court of Bombay Nagpur Bench Nagpur<br>3. Learned District & Session Court No. 14, Nagpur<br>4. Before Hon'ble High Court of Bombay Nagpur Bench Nagpur |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | No |
| | e. | Date of conviction, if any | Not Applicable |
| | f. | Details of punishment undergone, if any | Not Applicable |
| | g. | Anyother information required to be given | No |
| 2 | | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | Candidate **Devendra Gangadhar Fadnavis** is senior legislator. He was Chief Minister of Government of Maharashtra. He has very strong administrative capacity looking at his experience he has been chosen. |
| 3 | | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

**(2) Name of the Constituency : 52 - Nagpur South-West**

**Name of the candidate : DEVENDRA GANGADHAR FADNAVIS** and so on

Signature of office bearer of the Political Party

Name and designation...

**Chandrashekhar Bawankule**

**President,**

**Bharatiya Janata Party, Maharashtra**

# सावध व्हा : नकळत भेसळीचे विष प्राशन करतोय

आजच्या काळात शुद्ध व पोषक अन्न मिळविणे फार कठीण झाले आहे, प्रत्येकजण स्वतःच्या फायद्यासाठी दुसऱ्यांचा जीव घ्यायला तयार आहे. गेल्या काही वर्षांत देशात कर्करोग, हृदयविकार, ब्रेन स्ट्रोक आणि मानवी अवयव निकामी होण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. सर्व वयोगटातील



डॉ. प्रितम भी. गेडाम
८२३७४ १७०४१
prit00786@gmail.com

लोकांमध्ये अकाली मृत्यूचे प्रमाण सतत वाढत आहे आणि मानव शारीरिक व मानसिकदृष्ट्या दुर्बल होत चालला आहे. भेसळीचे विष आणि विषारी प्रदूषण हेच या समस्यांचे मूळ आहे. नकळत का होईना, भेसळ आणि प्लॅस्टिकचे विष आपण रोज सेवन करत आहोत.

आशिया खंडातील सर्वात मोठ्या रुग्णालयांमध्ये गणल्या जाणाऱ्या नागपूरच्या शासकीय रुग्णालयात नुकतेच हजारो रुग्णांना बनावट औषधांचे वाटप करण्यात आले. जगप्रसिद्ध तिरुपती मंदिरातील प्रसाद लाडू मध्ये प्राण्यांच्या चरबीचे भेसळ उघडकीस आली.

पिकांवर भाज्यांवर हानिकारक कीटकनाशकांची फवारणी करणे, धान्य पॉलिश करणे, खाद्यपदार्थांना आकर्षक बनवण्यासाठी घातक रासायनिक रंग वापरणे, फळे लवकर पिकविण्यासाठी जीवघेण्या रसायनांचा वापर करणे आणि बनावट खाद्यपदार्थांचा सर्रास वापर करून सर्वसामान्यांच्या आरोग्याशी आणि जीवाशी खेळ केला जात आहे आणि खाद्यपदार्थांमध्ये अस्वच्छतेची गंभीर समस्या आधीच आहे.

पिकांवर फवारलेल्या कीटकनाशकांचा विषारी परिणाम यावरून अंदाज लावता येतो की फवारणी करताना निष्काळजीपणा केल्यास एखाद्या व्यक्तीला लगेच जीव गमवावा लागतो. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या मते, २०२० ते २०२१ या काळात भारतात कीटकनाशकांच्या विषबाधेमुळे होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येत ६ टक्क्यांनी वाढ झाली आहे. गेल्या आठवड्यात नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात शेतातून वाहणारे पाणी पिऊन वाघाचा मृत्यू झाला, कारण ते कीटकनाशके मिसळलेले विषारी पाणी होते.

आपल्या देशात सण येताच काही निवडक वस्तूंची मागणी वाढते आणि मागणी वाढूनही वस्तूंचा पुरवठा कमी होत नाही हे आश्चर्यकारक आहे. उदाहरणार्थ, आपल्या महाराष्ट्र राज्यात कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी दुधाचे खास पेय बनवले जाते.

या दिवशी दुधाची मागणी इतर दिवसांच्या तुलनेत दुपटीपेक्षा जास्त असली तरी पुरवठा मात्र त्याहून अधिक होतो. आता असे होऊ शकत नाही की केवळ विशेष दिवशी दुभती जनावरे दुप्पट दूध देतात आणि उत्पादन एका दिवसात दुप्पट होते. जर एक गाय एका दिवसात १० लिटर दूध देते, तर ती दररोज १० लिटरच दूध देणार, मग बाजारात अचानक दुधाचा पुरवठा कसा वाढतो?

या भेसळयुक्त खाद्य पदार्थांपासून आरोग्य कसे वाचवायचे? असा गंभीर प्रश्न उपस्थित होतोय. कमी दर्जाच्या आणि भेसळयुक्त खाद्यपदार्थांच्या वापराच्या बाबतीत सध्या आपण शिखरावर आहोत. डॉक्टर म्हणतात जंक फूड वाईट, फळे खाणे चांगले, पण आता बाजारात फळे खरेदी कशी करणार?



मी माझा अनुभव सांगत आहे, दोन दिवसांपूर्वी मी शहरातील मुख्य फळ बाजारातून चांगल्या प्रतीची सफरचंद आणि मोसंबी खरेदी केली होती. फळांचे बाह्य आवरण पाहून, योग्य प्रकारे निरखून फळ खरेदी करूनही दुसऱ्याच दिवशी अर्ध्याहून अधिक फळे सडली.

फळे खरेदी करताना मी फळ विक्रेत्याकडे हल्ली कमी दर्जाच्या फळांची तक्रार केली होती, फळ विक्रेत्याने सांगितले की, त्यांच्याकडे असलेली फळे अतिशय उच्च प्रतीची आहेत, कोणतीही तक्रार होणार नाही, तरीही फळे खराब निघाली.

फळे लवकर खराब होण्याचे मुख्य कारण म्हणजे त्यांच्यावर होणारी घातक रासायनिक प्रक्रिया आणि दुसरे कारण म्हणजे क्षणाक्षणाला बदलणारे हवामान.

कंज्युमर गाईडन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वार्षिक अहवालात असे आढळून आले आहे की बाजारात उपलब्ध असलेले ७९ टक्के ब्रँडेड किंवा सैल दूध हे गंभीर गैर-पात्रतेच्या अधीन आहे. वर्ष २०१९ मध्ये, दुधाच्या पॅकेट्सच्या ४१३ नमुन्यांची चाचणी घेण्यात आली होती, त्यापैकी फक्त ८७ दुधाचे नमुने भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मानक वैशिष्ट्यांनुसार पात्र असल्याचे आढळले.

दुधात आरोग्यावर गंभीर परिणाम करणारे काही प्रमुख भेसळ म्हणजे युरिया, फॉर्मेलिन, डिटर्जंट, अमोनियम सल्फेट, बोरिक ॲसिड, कॉस्टिक सोडा, बेंझोइक ॲसिड, सॅलिसिलिक ॲसिड, हायड्रोजन पेरॉक्साइड, साखर आणि मेलामाइन आहे.

आपण फक्त दूध पितो असे नाही तर हजारो खाद्यपदार्थ, मिठाई बनवण्यासाठी त्याचा वापर केला जातो. आपल्या देशात उत्पादनापेक्षा जास्त दूध विकले जाते.

आज दुधापासून बनवलेल्या अनेक खाद्यपदार्थांमध्ये शुद्ध दुधाची चव जाणवत नाही, तरी सुद्धा उत्पादन पूर्णपणे शुद्ध असल्याचे विक्रेता आपल्याला पटवून देण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करतो.

संशोधनात असे म्हटले आहे की, देशातील प्रत्येक तिसरा माणूस भेसळ दुधाचे सेवन करत आहे. आजच्या पिढीला बाहेर खायला आवडते, त्यांना सर्व काही झटपट हवे असते, दर्जा नसला तरी, चव महत्त्वाची असते. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या अनेक व्हिडिओंमध्ये रस्त्यावरील रंगीबेरंगी खाद्यपदार्थ आरोग्यासाठी हानिकारक असल्याचे पाहायला मिळते. २०-३० रुपयांच्या डिशमध्येही भरपूर लोणी आणि चीज टाकले जाते.

कमी दर्जाचे पदार्थ, पॅकेज केलेले मसाले, सॉसेज, चटण्या, तेल यांचा जास्तीत जास्त वापर केला जातो. अनेकवेळा खाद्यपदार्थ तळल्यानंतरही ते तेल पुन्हा पुन्हा वापरले जाते. गरम पदार्थांमध्येही प्लास्टिकचा वापर अत्यंत हानिकारक आहे, तरीही त्याचा वापर केला जातो.

अशा बहुतेक पदार्थांमध्ये गुणवत्तेशी तडजोड केली जाते आणि पोषक तत्वांऐवजी केवळ विषारी घटक दिसतात. बाहेरील खाद्यपदार्थांमध्ये भेसळयुक्त घटकांचा वापर होण्याची दाट शक्यता असते. उदाहरणार्थ, जर आपण बाजारातून मसाले, हळद, लाल मिरची आणून घरी ग्राइंड करून मसाला बनवला, शेंगदाण्यापासून तेल, दुधापासून चीज, टोमॅटोपासून सॉस बनवला, तरीही एवढी मेहनत करून सुद्धा आपले उत्पादन बाजारातील तयार उत्पादनापेक्षा कितीतरी पटीने महाग असेल. मग बाजारात एवढ्या स्वस्तात उत्पादने कशी विकली जातात? जेव्हा की सध्या महागाईचे युग आहे.

भेसळयुक्त अन्न अत्यंत विषारी असते आणि त्यामुळे अनेक आरोग्य समस्या निर्माण होतात, भेसळयुक्त अन्न खाल्ल्याने अतिसार, मळमळ, ॲलर्जी, मधुमेह, हृदयविकार, किडनीचा कर्करोग, लॅथिरिझम, मज्जासंस्थेशी संबंधित आजार आणि यकृतासह अवयव निकामी होणे असे आजार होतात. काही भेसळमध्ये कार्सिनोजेनिक, क्लॅस्टोजेनिक आणि जीनोटॉक्सिक गुणधर्म आढळून आले आहेत.

२०१९ मध्ये भारतात दूषित पाण्यामुळे पाच लाखांहून अधिक मृत्यू झाल्याचे लॅन्सेट अभ्यासात आढळून आले आहे. आपल्या देशातील बहुतेक अन्नपदार्थांमध्ये हानिकारक घटक असतात, बनावट दारूमुळे सुद्धा देशात दरवर्षी मोठ्या प्रमाणात मृत्यू होतात.

जंक फूड, मैदा, साखर, मीठ, तेल हे आधीच स्लो पॉयझनसारखे काम करत आहेत आणि आपल्याला जीवघेण्या आजारांना बळी पाडत आहेत. देशातील वाढते प्रदूषण आपला श्वास हिरावून घेत आहे.

लॅन्सेटच्या अभ्यासानुसार, २०१९ मध्ये प्रदूषणामुळे भारतात २३ लाखांहून अधिक अकाली मृत्यू झाले. भेसळीच्या या जगात कोणतीही गोष्ट शुद्ध आहे याची शाश्वती नाही. जागरुक राहा, देखाव्याला बळी पडू नका, जिभेवर नियंत्रण ठेवा, आरोग्याची काळजी घ्या, घरगुती खाद्यपदार्थांना प्राधान्य द्या आणि निरोगी राहा.

●●●●●●●●●●

# फटाक्यांची (?) दिवाळी!



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

हिंदू धर्मातील सण, उत्सव केवळ मौज मजेसाठी असतात असे नव्हे, तर प्रत्येक सणामागील शास्त्र आणि ते कसे साजरे करावेत याबाबतचे ज्ञान आपल्या ऋषी मुनींनी हजारो वर्षांपूर्वी मांडून ठेवले आहे. ते तसे साजरे केल्यास मिळणारा लाभ अधिक असतो.

गेल्या काही वर्षांत आपल्या सण उत्सवांत अनेक अपप्रवृत्तीचा शिरकाव झाला आहे. या अपप्रवृत्ती एवढ्या हामी झालेल्या आहेत की सण उत्सवांच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जाऊ लागला आहे. गोपाळकाला सणामध्ये आता दहीहंडीच्या मनोऱ्यांचीच स्पर्धा रंगू लागली आहे. गणेशोत्सवामागील मूळ उद्देश बाजूला सरून प्रतिवर्षी गल्लीबोळांत नवनवीन मंडळे स्थापन होऊ लागली आहेत. गणेश मूर्ती, सजावट, मिरवणूक यांसारख्या कारणांनी मंडळांमध्ये तंटे होऊ लागले आहेत. नुकत्याच सरलेल्या नवरात्री उत्सवाचेही पुरते बाजारीकरण झाले आहे.

येऊ घातलेला दिपावली सणही यातून सुटलेला नाही. दीपावली म्हटले की दिव्यांची रोषणाई, कंदिलांची सजावट, फराळाचा सुगंध यासारख्या बाबी डोळ्यासमोर यायला हव्यात; मात्र सध्या दिवाळी म्हटले तर सर्वात आधी आठवते ती सर्वत्र फटाक्यांची आतषबाजी, त्यामुळे होणारा धुरच धूर, वाढणारे वायू प्रदूषण आणि कानठळ्या बसवणारे आवाज.

मुलांना कोणी सांगितले कि 'यंदा दिवाळीला कोणीही फटाके नाही फोडायचे' तर मुले त्याचे ऐकतील का? अजिबात नाही. 'फटाके दिवाळीला नाही फोडायचे तर केव्हा फोडायचे?' असा लागलीच त्यांचा प्रतिप्रश्नही असेल. अर्थात ही चूक लहानग्यांची अजिबात नाही. गेल्या काही वर्षांपासून दिवाळीनिमित्त प्रचंड प्रमाणात फटाके फोडले जातात.

दीपावली शब्दाचाच अर्थ दीप +आवली अर्थात दिव्यांची रांग असा आहे. दीपावली हा दिव्यांचा उत्सव आहे. तिमिराकडून तेजाकडे म्हणजेच अंधाराकडून प्रकाशाकडे नेण्याची शिकवण दीप आपल्याला देतो. कोणी कितीही गरीब असला तरी त्याच्या घरी दिवाळी दरवर्षी साजरी होतेच.

दिवाळीच्या निमित्ताने घर आणि सभोवतालचा परिसर स्वच्छ केला जातो, घराला रंगरंगोटी केली जाते, या सहा दिवसांत दाराबाहेर आकाशकंदील लावला जातो. दाराजवळ सुबक रांगोळी काढली जाते. दारात आणि तुळशीजवळ तेलाच्या पणत्या लावल्या जातात. घरोघरी लाडू, चकली कारंज्यांचा फराळ बनवला जातो. आप्तेष्टांना, मित्र मंडळींना दिवाळीच्या आणि पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या जातात. हीच दिवाळी साजरी करण्याची परंपरागत पद्धत. या सर्वांत फटाके वाजवणे कुठेच बसत नाही, मग ही प्रथा दिवाळीत शिरली तरी कुठून?

सुमारे २२०० वर्षांपूर्वी चीनच्या लुईयाँग प्रांतात फटाके फोडल्याचा संदर्भ आढळतो. आगपेटीच्या काडीप्रमाणे काठ्यांच्या टोकाला ज्वालाग्राही पदार्थाची गाठ बनवली जाई आणि ही गाठ आगीत धरल्यावर तिचा आवाज येत असे. ही आतषबाजी पुढे लग्नसमारंभांना होऊ लागली. १९२३ मध्ये भारतातील कोलकात्यामध्ये नाडर बंधूंनी आगपेटीच्या कारखान्यांमध्ये सर्वप्रथम फटाक्यांची निर्मिती केली. १९४० मध्ये तामिळनाडूतील शिवकाशी येथे फटाक्यांचा पहिला कारखाना सुरु झाला. तेव्हापासून आजतागायत शिवकाशी मध्ये अविरतपणे फटाक्यांची निर्मिती सुरु आहे.

दिवाळी सणाला सहस्त्रो वर्षांचा इतिहास आहे आणि फटाके बनवणारा पहिला कारखाना भारतात ८४ वर्षांपूर्वी तयार झाला आहे याचाच अर्थ दिवाळीत फटाके फोडण्याच्या प्रथेला कोणताही शास्त्रीय आधार नाही. पूर्वीचे राजे महाराजे आनंदाच्या क्षणी आतषबाजी करत असल्याचे दाखले इतिहासात सापडतात. ही आतषबाजी आता फटाक्यांच्या रूपाने दिवाळीत सर्वत्र होऊ लागली आहे. स्वातंत्र्य दिनाच्या किंवा सांस्कृतिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांत आतषबाजी करण्याची प्रथा पाश्चात्य देशांमध्ये सुद्धा आहे, मात्र ही आतषबाजी केवळ शोभेच्या फटाक्यांपुरती सीमित असते. आपल्याकडे मात्र शोभेपेक्षा अधिकाधिक आवाजाच्या फटाक्यांचीच स्पर्धा प्रतिवर्षी पाहायला मिळते.

दिवाळीच्या तोंडावर दरवर्षी प्रशासनाकडून फटाके फोडण्यासंदर्भातील नियमावली जाहीर केली जाते, आवाजाच्या मर्यादेपासून निषिध्द क्षेत्रेही नमूद केलेली असतात. मात्र या नियमावलीला हरताळ फासला जातो. सर्वत्रच फटाक्यांची आतषबाजी सुरु असल्याने कारवाई तरी कोणावर करणार, असा प्रश्न प्रशासनासमोर असतो. २०२१ साली भारतभरात सुमारे १५०० कोटी रुपयांचे फटाके दिवाळीच्या दिवसांत फोडले गेले. यंदा हा आकडा याहून अधिक असेल. आजमितीला लोकसंख्येत अव्वल असलेल्या भारतातील बराचसा भाग दारिद्र्यरेषेखाली जीवन कंठत आहे, देशातील कित्येक गावे कुपोषित आहेत. दिवसागणिक वाढत्या महागाईने सर्वसामान्यांचे जगणे मुश्किल केले आहे. अशा परिस्थितीत केवळ क्षणिक मौजेखातर फटाक्यांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची राख-रांगोळी करणे कितपत योग्य आहे?

शिवकाशी हे ठिकाण अव्वल दर्जाचे फटाके बनविण्यासाठी देशभर प्रसिद्ध आहे; मात्र याच शिवकाशीमध्ये दरवर्षी फटाक्यांच्या कारखान्यांना आगी लागून जीवित आणि वित्तहानी होण्याच्या अनेक घटना घडतात. या कारखान्यांतील दारूच्या प्रभावामुळे कारखान्यांत काम करणाऱ्या कितीतरी लहान मुलांना, कामगारांना असाध्य आजार जडतात, कायमचे अपंगत्व येते. याशिवाय दिवाळीच्या दरम्यान फटाक्यांच्या गोदामांना, दुकानांना आगी लागल्याच्या अनेक बातम्या दरवर्षी वाचनात येतात. फटाके फोडताना कित्येक जण भाजतात, जळके फटाके इतरत्र उडाल्यामुळे आगीच्या घटना घडतात ज्यामध्ये दरवर्षी शेकडो जण मृत्युमुखी पडतात तर हजारो जण जखमी होतात. याकाळात अग्निशमन दलावर प्रचंड ताण असतो. याशिवाय केवळ फटाक्यांच्या कारणावरून अनेक ठिकाणी भांडणे होतात त्या वेगळ्या.

वर उल्लेख केल्याप्रमाणे आपल्याकडे दरवर्षी अधिकाधिक आवाजाच्या फटाक्यांची स्पर्धा लागलेली पाहायला मिळते. कानठळ्या बसवणाऱ्या आवाजाच्या फटाक्यांमुळे इमारतींना तडे जातात, खिडक्यांच्या काचा फुटतात तसेच सिलींगचे प्लास्टरिंग सैल होण्याचाही धोका असतो. विजेचे काचेचे बल्बही फटाक्यांच्या आवाजामुळे फुटतात.

दिवाळीत फोडल्या जाणाऱ्या फटाक्यांमुळे लोकांच्या आरोग्यावर सर्वाधिक परिणाम होतो. कानठळ्या बसवणाऱ्या फटाक्यांमुळे कायमचा बहिरेपणा येऊ शकतो. अतिआवाजामुळे कान बधीर होतात. श्रवणयंत्रणातील पेशी एकदा मृत झाल्या की, त्या पुन्हा नव्याने निर्माण होत नाहीत. गर्भवती महिला, दीर्घ आजाराने ग्रस्त असलेले रुग्ण आणि नवजात बालके यांच्यावर फटाक्यांच्या आवाजाचा भयंकर परिणाम होतो. मायग्रेन, रक्तदाब आणि हृदयविकाराचा त्रास असणाऱ्या रुग्णांच्या त्रासामध्ये फटाक्यांच्या अतिआवाजामुळे अधिक वाढ होण्याची शक्यता असते. फटाके फोडल्यावर निर्माण होणाऱ्या विषारी धुरामुळे प्रचंड वायुप्रदूषण होते ज्याचा त्रास लहान मुलांसह अस्थमा आणि फुफुसाचा आजार असलेल्यांना अधिक होत असतो.

अमेरिकेसारख्या विकसित देशात मानवी आरोग्यावर परिणाम करणाऱ्या फटाक्यांवर बंदी घालण्यात आली आहे. न्यूझीलंड, इटली, फ्रान्स, बेल्जियम या देशांत केवळ प्रौढ व्यक्तींनाच फटाके विकत घेण्यास आणि फोडण्यास अनुमती आहे. आपल्याकडे मात्र असे धोरण प्रशासनाने आखलेले नाही. उलट इथे घरातील प्रौढच फटाके आणून ती लहानांना फोडण्यासाठी उपलब्ध करून देतात.

दिवाळीतील लक्ष्मीपूजनाच्या दिवशी घराघरात श्री महालक्ष्मी आणि श्री कुबेराचे पूजन केले जाते. लक्ष्मी ही धनाची देवता आहे तर कुबेर हा धनसंचयाचा देव आहे. एकीकडे योग्य मार्गाने धन प्राप्ती होण्यासाठी देवी लक्ष्मीची आणि आलेले धन टिकून राहावे यासाठी कुबेराची पूजा करायची आणि दुसरीकडे लक्ष्मीच्या कृपेने मिळालेले धन फटाक्यांच्या माध्यमातून विनाकारण व्यय करायचे हा विरोधाभास नव्हे काय ?

प्राचीन युगात राक्षस नागरिकांना त्रास देऊन असुरी आनंद मिळवायचे. आताच्या काळी फटाके फोडून इतरांना त्रास देऊन साजरा केल्या जाणाऱ्या आनंदाला असुरी आनंदच म्हणावे लागेल. आपल्याला एखादा आजार झाला कि त्यावर वेळीच उपचार घेऊन आपण त्याचे निराकरण करतो. फटाक्यांच्या रूपाने आपल्या हिंदू संस्कृतीतील दीपावली सारख्या व्यापक आणि सात्विक सणाला एकप्रकारचा आजारच जडला आहे. तो दूर करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. दीपावलीच्या तेजाला लागलेली फटाक्यांची काजळी दूर करून तिला पुनर्रतेज प्राप्त करून द्यायचे असेल, तर सुरुवात आपल्या घरापासूनच करावी लागेल.

●●●●●●●●●●

## दिवाळीतील आकाश आणि
# आकाशातील दिवाळी

**आकाशातील आतिषबाजी**

दिवाळी सण उत्सवाचे दिवसात विविध प्रकारचे खाद्य पदार्थ आणि अनेक प्रकारच्या फटाक्यांची आतिषबाजी केल्या जाते.अशाच प्रकारचा प्रकाश उत्सव वृषभ राशीतून ऑक्टोबरचा उत्तरार्ध व नोव्हेंबरच्या पूर्वार्धात उल्का वर्षाव होतांना दिसेल. विविधरंगी उल्का रात्री दहा नंतर पूर्व आकाशात पहाटे पर्यंत पाहता येतील.या उल्का या आधी येऊन गेलेल्या एन्के धुमकेतूचे वस्तूकण असुन ते गुरुत्वाकर्षणाने पृथ्वी कक्षेत आल्याने वातावरणात पेट घेतल्याने लाल, पिवळ्या, निळ्या पांढऱ्या रंगाच्या प्रकाशरेषा क्षणार्धात दिसेनाशा होतात




**इंटरनॅशनल स्पेस स्टेशन**

दरताशी २८,५००कि.मी या प्रचंड वेगाने फिरणारे हे अंतराळ संशोधन केंद्र दर दीड तासात एक पृथ्वी प्रदक्षिणा पूर्ण करतांना ज्या वेळी आपल्या भागात येते तेव्हा ते आकाशात फिरत्या चांदणीच्या स्वरूपात बघता येईल.

याशिवाय उत्तरेचा ध्रुवतारा सप्तर्षी व शर्मिष्ठा तारका समूहाचे आधारे, शौरी, तिमिंगल, ययाती व देवयानी ,सारथी ,कालेय, कृत्तिका, हंस,गरूड, मृग आदी तारका समूह अनमोल खजिन्याचे रूपात बघता येतील.

--------------

प्रभाकर दोड
विश्वभारती केंद्र प्रमुख, अकोला.

●●●●●●

# दिवाळीपर्यंत दररोज शुभमुहूर्त

पुष्य नक्षत्रानंतरही दिवाळीपर्यंत दररोज शुभ योग राहील. या कारणास्तव, संपूर्ण आठवडा खरेदीसाठी शुभ काळ असेल. ज्योतिषी मानतात की या दिवसांत धनत्रयोदशीला तिप्पट लाभ देणारा योग आहे, त्यामुळे हा दिवस खरेदी, गुंतवणूक आणि नवीन सुरुवात करण्यासाठी खास असेल.

25 ते 31 ऑक्टोबर या कालावधीत ग्रह-तारे दररोज शुभ योग तयार करत आहेत. या संयोगामुळे पुढील 7 दिवस खरेदीसाठी शुभ मुहूर्त असेल. या वेगवेगळ्या दिवशी तुम्ही दागिने, कपडे, भांडी, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक वस्तू, वाहने आणि मालमत्ता खरेदी करू शकता. शेअर मार्केट, भविष्यातील देवाणघेवाण आणि रिअल इस्टेटमध्ये गुंतवणूक करण्यासाठीही हा आठवडा शुभ राहील.

29 ऑक्टोबरला धनत्रयोदशीला तिथीनुसार आणि नक्षत्राचा मेळ साधून त्रिपुष्कर नावाचा शुभ योग तयार होत आहे. या शुभ योगात केलेली गुंतवणूक तिप्पट लाभ देऊ शकते. त्रिपुष्कर योगामध्ये खरेदी करणे देखील तिप्पट शुभ आणि लाभदायक




मानले जाते. या दिवशी व्यवसाय आणि शुभ कार्याची सुरुवात करावी. ज्यांना 30 तारखेला खरेदी करायची आहे त्यांच्यासाठी सर्वार्थ सिद्धी योगात दुसऱ्या दिवशी खरेदी करणे देखील शुभ राहील.

# दिवाळी अंक म्हणजे पर्वणीच

आपल्या देशात दिवाळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. आताही देशात दिवाळीची धामधूम सुरू आहे. वेगवेगळ्या वस्तूंच्या खरेदीसाठी बाजारपेठा फुलल्या आहेत. सर्वत्र दिवाळीच्या खरेदीची धामधूम सुरू आहे.

आकाश कंदील, मिठाई, फटाके, नवीन कपडे, नवीन वाहने, इलेक्ट्रॉनिक वस्तू यांच्या खरेदीसाठी दुकाने फुलून गेली आहेत. दिवाळीमुळे सर्वांच्या उत्साहाला उधाण आले आहे. दिवाळी म्हटले की फटाके, आकाशकंदील, पणत्या, नवीन कपडे, नवीन वस्तू असे जे समीकरण आहे तसेच दिवाळी म्हणजे दिवाळी अंक असेही एक समीकरण आहे.

दिवाळी आली की वाचकांना वेध लागतात ते दिवाळी अंकाचे आणि वाचकांचे पाय आपसूकच दिवाळी अंकाच्या खरेदीसाठी पुस्तकांच्या दुकानाकडे वळतात. महाराष्ट्रात तर दिवाळी अंकांची परंपरा खूप पूर्वीपासून आहे. १९०९ साली पहिला दिवाळी अंक प्रसिद्ध झाला होता त्याचे नाव मनोरंजन असे होते. पहिला दिवाळी अंक प्रसिद्ध होऊन आज ११५ वर्ष झाली आहेत.

आपल्या राज्यात दरवर्षी विविध विषयांवरची दजेर्दार दिवाळी अंक प्रसिद्ध होतात. महाराष्ट्रात जवळपास हजाराच्या जवळपास दिवाळी अंक प्रकाशित होतात. दिवाळी अंक म्हणजे वाचकांसाठी मेजवानीच. कला, क्रीडा, राजकारण, अर्थकारण, विनोद, साहित्य, कथा, कांदबरी, कविता, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, आहार, व्यंगचित्र, भविष्य अशा वेगवेगळ्या विषयांवरील दिवाळी अंक वाचणे म्हणणे पर्वणीच. अनेक वृत्तपत्रे वाचकांसाठी दिवाळी अंक काढत असतात. फटाके, मिठाई, फराळ यासमवेतच दिवाळी अंक ही सुशिक्षित आणि साहित्यप्रेमी घरांसाठी एक आवश्यक घटक आहे.

कोरोना काळात दिवाळी अंकाच्या छपाईला आणि वितरणाला मयार्दा आल्या होत्या त्यामुळे तुलनेने कमी दिवाळी अंक प्रसिद्ध झाली होती. असे असले तरी काही संपादकांनी आणि प्रकाशकांनी आपले अंक ऑनलाइन प्रसिद्ध केले होते. वाचकांना ते विविध डिजिटल प्लॅटफॉर्मवर उपलब्ध झाले होते. काहींनी आपले अंक पीडीएफ स्वरूपात उपलब्ध करून दिले होते. वाचकांनी त्याची प्रिंट काढून ते वाचले होते.

आता कोरोनाचे दुष्चक्र संपले असल्याने दिवाळी अंकांना पुन्हा एकदा सुगीचे दिवस आले आहेत. यावर्षी अनेक प्रकाशकांनी आपले दिवाळी अंक प्रकाशित केले आहेत. यासोबतच ऑडिओ - व्हिज्युअल दिवाळी अंकही आहे. वाचक पूर्वीच्याच उत्साहाने दिवाळी अंकाचे स्वागत करीत आहे. दिवाळी अंक आपल्या साहित्य संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. दिवाळी अंकामुळे वाचन संस्कृती रुजायला खूप मदत झाली आहे.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

वाचन संस्कृती रुजवण्यात व नव्या पिढीला वाचन संस्कृतीकडे घेऊन जाण्यास दिवाळी अंकाचा मोठा वाटा आहे. यावर्षी आपण आपल्या मित्र परिवारांना, नातेवाईकांना दिवाळीच्या शुभेच्छा व फराळासोबत दजेर्दार दिवाळी अंक भेट द्यावेत. वाचनाची गोडी वाढवण्यासाठी दिवाळी अंक हा चांगला मार्ग आहे. गोडाधोडाचा फराळासोबतच वाचनाचा हा फराळही दिला तर दिवाळीची गोडी आणखी वाढेल आणि वाचन संस्कृती रुजायलाही मदत होईल.

●●●●●●

# ७४ कोटी भारतीयांना फायलेरियाचा धोका




भारताने गेल्या काही वर्षांमध्ये लिम्फॅटिक फायलेरियासिस (हत्तीरोग) चा सामना करण्यासाठी लक्षणीय प्रगती केली आहे. नुकतेच, नॅशनल सेंटर फॉर वेक्टर बोर्न डिसीज कंट्रोलने या रोगाचा सामना करण्यासाठी 6 राज्यांमधील 63 जिल्ह्यांना लक्ष्य करून मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन मोहीम सुरू केली. सन 2023 मध्ये प्राप्त झालेल्या 82.5% कव्हरेज दराला मागे टाकण्याचे उद्दिष्ट होते.

फायलेरिया हा एक संसर्गजन्य रोग आहे, जो डासांच्या चाव्याव्दारे पसरतो. यामुळे, द्रव धारणा होऊ शकते म्हणजेच शरीराच्या कोणत्याही भागात द्रव जमा होऊ शकतो. बर्याच बाबतीत ते विकृती किंवा अपंगत्व देखील होऊ शकते.

या आजाराने प्रभावित झालेला अवयव फुगतो आणि जड होतो. साधारणपणे यामुळे पायाचा आकार खूप जड होतो. यामुळेच याला हत्तीरोग किंवा हत्तीच्या पायाचा आजार असेही म्हणतात. सामान्य भाषेत लोक याला फायलेरियासिस म्हणतात. सध्या भारतातील 74 कोटी लोकांना फायलेरियासिसचा धोका आहे.

इंडियन जर्नल ऑफ पब्लिक हेल्थमध्ये प्रकाशित झालेल्या अहवालानुसार, भारतातील सुमारे 74 कोटी लोकांना फायलेरियासिसचा धोका आहे, तर 3.1 कोटी लोकांना याची लागण झाली आहे. यापैकी सुमारे 2.3 कोटी लोक लक्षणे आहेत, म्हणजेच त्यांच्या शरीरात लक्षणे दिसतात. असे लोक मोठ्या संख्येने आहेत ज्यांना फायलेरियासिसची लागण झाली आहे परंतु त्यांच्या शरीरात कोणतीही लक्षणे दिसत नाहीत.

असे असूनही, त्याची लिम्फॅटिक प्रणाली आणि मूत्रपिंड खराब होत आहेत. लिम्फॅटिक सिस्टीम ही आपल्या शरीरातील एक महत्वाची यंत्रणा आहे. ते ऊतींमधील अतिरिक्त पाणी काढून टाकते आणि ते रक्तप्रवाहात परत करते.हे एक प्रकारचे पांढरे रक्त पेशी तयार करते, जे रोगजंतूंशी लढून रोगांपासून आपले संरक्षण करतात.ते पचनसंस्थेतील चरबी विरघळणारी जीवनसत्त्वे आणि प्रथिने शोषून घेते आणि रक्तप्रवाहात पाठवते.

●●●● क्रमशः ●●●●

## अशोकायन

### अबब..पाचशेचा स्टँप?

देशाच्या नाममुद्रेची
व्हॅल्यु होत नसते कमी
तो स्टँप पन्नासचा असो
की पाचशेचा ध्यानी घ्या तुम्ही

सोन्याचा तुकडा
छोटा असो की मोठा
व्हॅल्यु असते सेम
मग स्टॅप किंमत वाढविण्याचा
का खेळताहेत गेम?

फुकट छाप योजनांचा
असाच होत राहिला वर्षाव
तर भोळ्या मतदारांनो
स्टँप हजाराचा होईल राव..



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# वृद्धाश्रमात पुरणपोळीचे भोजन देत लगीनगाठ



■ महासागर प्रतिनिधी,
आर्णी, दि. २३ : वडीलांचे छत्र हरवलेल्या नेहा विलास चौधरी हीने आपल्या लग्नाचा विधी जगत मंदीर यवतमाळ येथे पारपाडून रजिस्टर मॅरेज पद्धतीने उमरी पठार येथील संत श्री दोला महाराज वृध्दाश्रमातील वृध्दांना पुरणपोळीचे स्नेहभोजन देवून वृध्दांच्या आशिर्वादाने आपल्या सहजीवनाचा प्रारंभ केला आहे, स्व. विलास विष्णू चौधरी रा. आर्णी यांची व्दितीय कन्या नेहा विलास चौधरी ही पोस्ट ऑफिसमध्ये कार्यरत आहे. खरं तर वैवाहिक जीवनात कुठलाही निर्णय दोघांची वैचारिक बैठक एक असल्याशिवाय घेणं शक्य होत नाही. नेहानं घेतलेल्या ह्या निर्णयाला सूरज नंदकिशोर ढोले यांनीही भरभरून प्रोत्साहन दिले आणि हसत रजिस्टर मॅरेजसाठी होकार दिला. सासरच्या कुटुंबाबद्दल नेहाला असणारी आत्मीयता आणि त्यांचा तीला असणारा संपूर्ण पाठींबा, अभिमान तथा प्रोत्साहन हे समाजासाठी आदर्श ठरणार आहे.

नवरी–नवरदेव आणि लग्न सोहळे समाजात काही नवीन नाहीत. चमचमीत जेवण आणि भरजरी मंडप हे रोजचं झालेलं असताना वृद्धाश्रमात जाऊन म्हाताऱ्या डोळ्यातून स्वतःचं ओघळणारं कौतूक टिपणं आणि त्यांना सुग्रास पुरणपोळीचं जेवण देऊन आशीर्वाद कमवणं हे नेहा व सुरजला जास्त श्रेयस्कर वाटलं. यावेळी वृध्दाश्रमातील वृध्दमंडळीने औक्षण करुन नवरदेव नवरीला भरभरून आर्शिवाद दिले. विशेष म्हणजे वराकडील मंडळी (सौ मंगला व नंदकिशोर रामराव ढोले) याही आधी लग्नाचा वाढदिवस साजरा करण्यासाठी उमरी पठारच्या वृद्धाश्रमात स्वेछेने जात होते आणि त्यातूनच नेहाला ही प्रेरणा मिळाली.

लग्नाचा कुठलाही मुहूर्त नसताना कार्य भावी सुनेच्या या निर्णयामुळे आधीच परोपकार आणि समाजसेवेस प्राधान्य देणाऱ्या ढोले कुटुंबास यामुळे आनंद झाला! चौधरी व ढोले कुटूंबियातील नातेवाईक मित्रमंडळीसह वृध्दाश्रमाचे संस्थापक शेषराव डोगरे, जयप्रकाश डोकरे यांच्यासह वृध्दाश्रमातील वृध्द मंडळी उपस्थित होते. लग्नाचा कुठलाही मुहूर्त नसताना संत तुकडोजी महाराज पुण्यतिथी हाच आमचा मुहूर्त म्हणत रजिस्टर मॅरेज करणाऱ्या नेहा चौधरी व सूरज नंदकिशोर ढोले यांचे सर्वांनी कौतूक केले.

# जमिनीच्या कारणावरून दोन गटांत तुफान हाणामारी

■ महासागर प्रतिनिधी,
पुसद, दि. २३ : तालुक्यातील बेलोरा गावात जागेच्या कारणावरून दि. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३०. वाजताच्या दरम्यान दोन गटात हाणामारी झाल्याची घटना घडली. या हाणामारीत २२ ते २३ जण जखमी झाल्याची बाब उघडकीस आली आहे. तर पाच ते सहा जण गंभीर जखमी झाले असून त्यांना अधिक उपचाराकरिता यवतमाळला रेफर केल्याची प्राथमिक माहिती पोलिस सूत्रांकडून मिळाली आहे. दोन्ही गटातील दहा ते पंधरा जणांना पोलिसांनी शांतता निर्माण व्हावी यासाठी ताब्यात घेतले आहे.

या प्रकरणी खंडाळा पोलिस ठाण्याच्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तालुक्यातील बेलोरा गावातील शहीदांचे स्मारक व विहाराच्या जागेच्या कारणावरून गेल्या अनेक दिवसांपासून वाद निर्माण झाला होता. तो वाद दि. २७ सप्टेंबर रोजी वरिष्ठ प्रशासनाच्या उपस्थितीत मिटवण्यात देखील आला होता, अशी प्राथमिक माहिती मिळाली आहे. भिमनगर येथील प्रस्तावित जागेच्या कारणावरून दोन गटांमध्ये विनाकारण वाद निर्माण होऊ नये यासाठी दि. ४ ऑक्टोबर रोजी उपविभागीय अधिकाऱ्यांना भिम टायगर सेनेचे जिल्हाध्यक्ष किशोर कांबळे यांच्या नेतृत्वाखाली गावातील रहिवाशांकडून देण्यात आले होते. अशातच घटनेच्या दिवशी दि. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी९.३० . वाजताच्या दरम्यान भीम नगर येथील प्रस्तावित शहीद स्मारकाच्या भिंतीचे काम गावातील नवीन समाज मंदिरापासून उत्तर दिशेला व सरळ रेषेतच पूर्वेकडील रोड पर्यंत उर्वरित मोकळी जागा ठेवून दलित वस्तीला सामाजिक कार्य तसेच मंगल कार्यासाठी ठेवण्याबाबतचे निवेदन दिले होते. असे असतानाच गावातील काही नागरिकांनी जागेच्या कारणावरून वाद निर्माण केला. त्यानंतर शिवीगाळ करीत लाठीकाठी तसेच दगडाने मारहाण झाल्याची घटना घडली. मरहाणीत पाच जण गंभीर जखमी झाले असून एका महिलेच्या तोंडावर दुसऱ्या गटातील एकाने फावडा मारल्याने त्यांचा जबडा निकामी झाला आहे. तर दुसऱ्या गटातील एक जण गंभीर जखमी झाला असून त्याला येथील एका खासगी रुग्णालयात उपचाराकरिता दाखल करण्यात आले आहे.

मारहाणीत काही जणांचे हात तर काही जणांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. या घटनेमुळे गावात तणाव निर्माण झाल्याने येथील पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले होते.

त्यानंतर संबंधितावर कारवाई करण्याची मागणी करण्यासाठी आंदोलन देखील करण्यात आले होते. प्रकरण चिघळत असल्याने पोलिसांनी नाकाबंदी केली होती. वरिष्ठ पोलिस अधिकारी दाखल होताच रहिवाशांची समजूत काढण्यात आली व संबंधितावर कारवाई करण्यात येईल असे सांगण्यात आल्याने वातावरण थोडे शांत झाले होते अशी सर्व माहिती जखमींकडून मिळाली होती. वृत्तलिस्तोवर खंडाळा पोलीस ठाण्याच्या पोलिसांकडून अधिकची कारवाई सुरू होती. बेलोरा येथे राहणारे निर्मला भगवान कांबळे (वय ४५), सुनील सखाराम इंगोले (५४), बाबुराव अनंतराव खंदारे (५५), प्रशिक भगवान कांबळे (), आशा बाबू कांबळे (३५), सोहम प्रकाश खंदारे (९७९६९६), रावसाहेब गंगाराव कांबळे (४०), वंदना विलास कांबळे (४०), शोभा मधुकर कांबळे (२४), लक्ष्मी श्रीराम भगत (६५), स्वाती नंदू कांबळे (१२), सतीश भगवान कांबळे (३०), रवींद्र नागोराव धवसे (५०), उषा सुनील इंगोले (४०), ज्योती गायकवाड (३५), प्रशांत संजय भगत (३०), गौतम चंपक पठाडे (६०), नंदा सुरेश कांबळे (५०) यांना येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचाराकरिता दाखल करण्यात आले होते. तर चार ते पाच जखमींना यवतमाळ येथे रेफर केल्याची माहिती दिली.

# सुमीतच्या खुनात आईचाही सहभाग, न्यायालयीन कोठडीत रवानगी

■ महासागर प्रतिनिधी,
उमरखेड, दि. २३ : चुरमुरा गावाजवळील दगडथर रस्त्यावरील जंगलातील दरित सुमीत सोळंके या २३ वर्षीय तरुणाचा मृतदेह दि. १३ ऑक्टोबर दुपारी १२ वाजता छिन्नविछिन्न अवस्थेत आढळून आल्याने खळबळ उडाली होती. दरम्यान या खुनाच्या आरोपीला पकडण्यासाठी पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. मात्र अवघ्या ९२ तासातच मारेकरी आरोपी आईच्या मामेभाऊच्या मुसक्या पोलिसांनी आवळून जेरबंद केले होते. मात्र सुमीतच्या खुनाचा कट रचण्यात आईचाही सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने पोलिसांनी दि.२२ ऑक्टोबर रोजी तिला अटक केली असून न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे. सुमीत प्रभाकर सोळंके (वय २३) याचा मृतदेह चुरमुरा गावापासून तिन किमी अंतरावर दगडथर रस्त्यावरील एका दरीत रक्तबंबाळ अवस्थेत आढळून आला होता. सुमीतचा मारेकरी हा त्याच्या आईचा मामेभाऊ संदीप अवधुत जगताप (वय४९ ) याला पोलिसांनी अवघ्या बारा तासातच अटक केली होती. या खून प्रकरणी त्याला ५ दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली होती. दरम्यान पोलिसांनी कसून चौकशी केली असता त्यावेळी त्याने सुमीत सोळंके हा त्याची आई अरुणा सोळंके हिला सतत पैशाची मागणी करित होता. तो मोठ्या प्रमाणात व्यसनाच्या आहारी गेला होता. त्यामुळे त्याच्या सततच्या त्याची आई कंटाळली होती. आणि आरोपी कडील पैशासाठीही त्याला तगादा लावत असल्याने सुमीत याच्या खुनाचा कट रचल्याची कबुली आरोपीने पोलिस चौकशीत दिली होती. सुमीत सोळंकेच्या आईच्या मोबाईलचे कॉल डिटेल तपासले असता आई अरुणा सोळंके हिच्या मोबाईलवरून आरोपी संदीप जगताप याला १२ वेळा कॉल केल्याचे तपासात निष्पन्न झाले. यावरून पोलिसांनी चौकशीसाठी अरुणा सोळंके हिला दि. २२ ऑक्टोबर रोजी ताब्यात घेतले.

पोलिसांनी अरुणा प्रभाकर सोळंके (वय ४५) हिला अटक करून न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडीत रवाना केले आहे. खूनाचा तपास करण्यासाठी जिल्हा पोलिस अधिक्षक कुमार चिंता, अप्पर पोलिस अधिक्षक पियुष जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलिस अधिकारी हनुमंत गायकवाड, ठाणेदार शंकर पांचाळ, सहायक पोलिस निरीक्षक निलेश सरदार, गजानन गिते यांनी कामगीरी केली.

संगनमताने खून केल्याची कबुली सुमीतच्या वडीलांचे अपघातामध्ये निधन झाल्यामुळे विमा पॉलीसीचे लाखो रुपये मिळाले होते. ते पैसे त्याने पूर्णपणे व्यसनाच्या आहारी जावून उधळले होते. त्यानंतरही तो घरातील वस्तू विकणे, अन्नधान्य विकत होता. त्यामुळे त्याच्या सततच्या त्रासाला कंटाळून आम्ही संगनमताने खून केल्याची कबुली पोलिसांना त्याच्या आईने दिली.

# दुचाकीची समोरासमोर धडक शेतकऱ्यासह दोघांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २३ : भरधाव व अनियंत्रीत दुचाकीची समोरासमोर धडक होवून झालेल्या अपघातात दोन्ही दुचाकीस्वार ठार झाले. राष्ट्रीय महामार्गावरील माणिकपुर फाट्याजवळ सायंकाळच्या सुमारास हा अपघात झाला. मृतांची नावे पुरुषोत्तम बासकवरे व जगन ठेपे अशी आहेत. वरुड तालुक्यातील गोरेगाव येथील पुरुषोत्तम भीमराव बासकवरे (५५) हे एम.एच.२७ बीएच २७२१ क्रमांकाच्या दुचाकीने बेनोड्यावरुन गोरेगाव येथे जात होते. त्याचवेळी विरुद्ध दिशेने शेतातून विद्युत पंप बंद करून जगन ठेपे (५२) हे एम.एच.२७ बीएक्स३७६८ क्रमांकाच्या दुचाकीने नागझीरीवरून बेनोडा शहीदकडे येत होते. माणिकपूर फाट्यानजीक दोन्ही दुचाकींची समोरासमोर धडक झाली. या धडकेत दोन्ही दुचाकीचालक घटनास्थळीच मृत्यूमुखी पडले.

अपघात झाल्याचे कळताच रस्त्याने ये–जाकरणारे नागरिक तसेच बेनोडा, गोरेगाव, नागझिरी व माणिकपूर येथील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. त्यातील एकाचा मृतदेह छिन्नविछिन्न अवस्थेत आढळून आल्याने अपघातानंतर नेमके काय घडले, याबाबत वेगवेगळे तर्क–वितर्कढले जात आहे.

अपघात घडताच बेनोडा (शहीद) पोलिसांनी घटनास्थळ गाठून दोन्ही मृतदेह ग्रामीण रुग्णालयात रवाना केले तर अपघातग्रस्त दुचाकी पोलिस स्टेशन परिसरामध्ये आणून घटनास्थळाचा पंचनामा केला. या प्रकरणाचा पुढील तपास बेनोडा (शहीद) पोलिस स्टेशनचे ठाणेदार ज्ञानोबा फड यांचे मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

आझादी का अमृत महोत्सव · स्वच्छ सर्वेक्षण 2024 · Majhi Vasundhara 5.0

: कार्यालय :

## नगर परिषद, कळमेश्वर–ब्राम्हणी, जिल्हा नागपूर

ULB Code - 802703

जावक क्र.: नपक–ब्रा / आरोग्य वि. / जाहिरात / १४०५ / २०२४ दिनांक २४.१०.२०२४

**स्वच्छ सर्वेक्षण २०२४–२५ व माझी वसुंधरा ५.० अंतर्गत जाहीर सूचना**

### फटाके बंदीबाबत सूचना

कळमेश्वर–ब्राम्हणी शहरातील सर्व फटाके विक्री करणारे व्यावसायिक व फटाके वापर करणारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भारत सरकार, अधिसूचना क्रमांक G.S.R.682 (E) Date. 05/10/1999 अन्वये 125 dB (AI) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री वापर करण्यास मनाई केली आहे. व महाराष्ट्र शासन निर्णय परिपत्रक क्रमांक संकिर्ण १०२० / सी–१८६ / पोल–९ दिनांक ०६ नोव्हेंबर २०२० यानुसार परदेशातून आयात केलेले फटाके विक्री व त्यांचा वापर यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. अशा फटाक्यांचे उत्पादन, विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाक्यांमध्ये बेरियम सॉफ्ट, लिथीयम, अर्सेनिक, लीड, मर्क्युरी, यासारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे. या घटकांमुळे विषारी वायु तयार होतात हे वायु प्राणी व वनस्पती या दोघांना घातक आहेत. तसेच जनहित याचिका क्र. १५२ / २०१५ मध्ये मा.ना. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाका विक्रेत्यांनी विस्फोटक व अधिनियम १८८४ आणि त्यास अंतर्गत केलेले विस्फोटक नियम २००८ मधील प्रतिबंध व नियम यांची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. तरी फटाके विक्रेत्यांनी बंदी असलेले फटाके विक्री करू नयेत. तसेच फटाक्यांची विक्री नगरपरिषदेने निश्चित केलेल्या ठिकाणी परवानगी घेवूनच करण्यात यावी.

महाराष्ट्र शासनाने माझी वसुंधरा अभियान ५.० आणि स्वच्छ सर्वेक्षण २०२४–२५ अभियानांतर्गत फटाके मुक्त प्लास्टीक मुक्त, कचरा मुक्त, प्रदुषण मुक्त व पर्यावरणपूरक ग्रीन फेस्टीवल, सण–उत्सव साजरे करण्याचा प्रयत्न करू. सदर अभियानांतर्गत नागरिकांनी फटाक्यांचा वापर टाळावा. प्लास्टीकचा वापर टाळून कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करा. पर्यावरण पुरक, प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करावी. तरी येणारी दिवाळी हरीत व पर्यावरणपूरक दिवाळी म्हणून साजरी करून पर्यावरण समतोल राखण्यास सहकार्य करावे, सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

: विनीत :
**आकाश सुरडकर**
प्रशासक तथा मुख्याधिकरी
नगर परिषद, कळमेश्वर–ब्राम्हणी

**Format C-7**
(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.
(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of the Election : Maharashtra Legislative Assembly-2024**
**Name of State/UT : Maharashtra**
**(1) Name of the Constituency : 54 - Nagpur East**
**Name of the candidate : KRUSHNA PANCHAM KHOPADE**

| Sl. No. | | | |
|---|---|---|---|
| 1 | **Criminal antecedents** | | |
| | a. | Nature of the offences | 1. FIR No. 504/2020 u/s. 188, 270 of IPC, Section 135 Maharashtra Police Act with Nandanvan Police Station.<br>2. FIR No. 111/2022 u/s. 143, 188 of IPC, Section 135 Maharashtra Police Act with Lakkadganj Police Station.<br>3. FIR No. 397/1996, u/s. 174 Indian Railway Act with Lakkadganj Police Station.<br>4. FIR No. 22/2004 u/s. 295, 143, 435, 427 of IPC, Section 135 Maharashtra Police Act with Lakkadganj Police Station.<br>5. FIR No. 42/2022 u/s. 188, 270 of IPC, Section 135 Maharashtra Police Act with Lakkadganj Police Station.<br>All Cases are Political Cases for Agitation |
| | b. | Case no. | 1. SCC No. -19443/2021<br>2. SCC No.- 4899/2023<br>3. C.C. No. -384/1997<br>4. RCC No. - 30563/2005<br>5. SCC No.- 5687/2022 |
| | c. | Name of the Court | Case Sr. No. 1 - Hon'ble J.M.F.C., Court No. 2, Nagpur.<br>Case Sr.No. 2 to 5 - Hon'ble J.M.F.C., Court No. 3, Nagpur. |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | 1. No<br>2. No<br>3. No.<br>4. Yes<br>5. Yes |
| | e. | Date of conviction, if any | Nil |
| | f. | Details of punishment undergone, if any | Nil |
| | g. | Any other information required to be given | The cases are still under consideration before the Hon'ble Court. |
| 2 | | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | Candidate **Krushna Pancham Khopade** has been very Senior Legislator. He has very strong administrative capacity. Looking at his experience he has been chosen |
| 3 | | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

**(2) Name of the Constituency : 54 - Nagpur East**
**Name of the candidate : KRUSHNA PANCHAM KHOPADE** .................................. and so on
* In the case of election to Council of States or States or Election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of Constituency.

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३




# हा निर्णय 'पटेल' का?

**चंद्रिकापुरे यांचा सवाल**

**पटेलांवर करणार प्रहार**

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :** गोंदिया जिल्ह्याच्या अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघाचे मावळते आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांना डावलून अजित पवार राष्ट्रवादी गटाने भाजपातून आलेले राजकुमार बडोले यांना उमेदवारी जाहीर केली.

या निर्णयानंतर चंद्रिकापुरे कमालीचे संतापले असून, त्यांनी अजित पवारांसह प्रफुल पटेल यांच्यावर आगपाखड केली आहे . पक्षाने आपल्यासोबत विश्वासघात केला असून, पक्षाचा हा निर्णय जनतेला 'पटेल' च असं नाही म्हणत, अजित पवार यांना पत्र लिहिले आहे . चंद्रिकापुरे यांचे हे पत्र समाज माध्यमांवर वेगाने व्हायरल झाले आहे . दुसरीकडे, विश्वासघाताचा बदला म्हणून प्रहार करण्याच्या निर्णयाने चंद्रिकापुरे यांनी बच्चू कडू यांच्या प्रहार जनशक्ती पक्षातर्फे निवडणूक लढण्याचे निश्चित केले असून, प्रहारमध्ये प्रवेशही केला आहे .

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या ३८ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. मात्र या यादीत गोंदिया येथील अजुर्नी मोरगाव मतदारसंघातील विद्यमान आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांचे तिकीट कापले.

आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी बंडखोरी करत महाराष्ट्रातील तिसरी आघाडी परिवर्तन महाशक्तीमधील प्रहार या पक्षात प्रवेश करत मैदानात उतरणार आहेत. मनोहर चंद्रिकापुरे व त्यांचे पुत्र सुगत चंद्रिकापुरे यांनी प्रहार पक्षात प्रवेश केला आहे. त्यामुळे येथे तिरंगी लढत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भाजपमधून अजित पवारांच्या गटात राजकुमार बडोले यांनी पक्षप्रवेश करत उमेदवारी मिळवल्याने मनोहर चंद्रिकापुरे यांनी नाराजी व्यक्त करत बंडखोरी केली असल्याचे दिसत आहे.

२००९ आणि २०१४ मध्ये सलग दोन वेळा भाजपाकडून आमदार म्हणून निवडून आलेले राजकुमार बडोले ५ वर्ष समाजकल्याण मंत्री होते . गेल्या निवडणुकीत राष्ट्रवादीचे चंद्रिकापुरे यांनी त्यांचा पराभव केला. दरम्यान, महायुतीत ही जागा राष्ट्रवादीकडे असल्याने भाजपाकडून तिकीट मिळणार नसल्याचे लक्षात आल्याने बडोले यांनी मंगळवारी राष्ट्रवादीत प्रवेश केला आणि बुधवारी त्यांना उमेदवारी जाहीर झाली.

आपले तिकीट कापण्यामागे प्रफुल पटेल असल्याची चंद्रिकापुरे यांची शंका असून, आता त्यांनी प्रहारच्या माध्यमातून राष्ट्रवादीसोबत दोन हात करण्याची तयारी केली आहे . या मतदारसंघात यावेळी त्रिकोणी लढत होवू शकते.

### दादा हा 'विश्वासघात' जनतेला 'पटेल'च असं नाही....!



प्रति
आदरणीय अजित दादा

नमस्कार,
मी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा निष्ठावंत व एकनिष्ठ कार्यकर्ता बोलतोय.
आज माझं तिकीट कापण्यात आल्याचं समजलं, मुंबईत येऊनही रिकाम्या हाताने परत यावं लागलं, याचं मनापासून दुःख झालंय.
दादा, जेव्हा महायुतीत जाण्याचा निर्णय तुम्ही घेतला तेव्हा इच्छा नसतानाही आपल्यावर श्रद्धा आणि विश्वास ठेऊन मी आणि माझा मतदारसंघ तुमच्यासोबत राहिला. आम्ही तुमच्यावर विश्वास ठेवला, पण तुम्ही माझा विश्वासघात केला. केवळ, माझाच नाही तर माझ्यासह माझ्या अर्जुनी मोरगाव मतदारसंघातील लाखो नागरिकांचा हा विश्वासघात आहे. मीच राष्ट्रवादीचा उमेदवार असेन, असं सांगत मी मतदारसंघातील गावं न गावं पिंजून काढली, येथील जनतेला भेटून आपली भूमिका कशी बरोबर आहे, हे समजावलं. पण, ऐनवेळी माझ्याच पाठीत खंजीर खुपसला.

दादा, पाठीत खंजीर खुपसल्याचे वाईट वाटते हो, पण ज्या हातात खंजीर आहे, तो हात आपलाच असल्याचर जास्त वाईट वाटते. दोन दिवसांपूर्वी भाजपचा नेता प्रफुल भाई पटेल यांना भेटला आणि त्यांना पटलं.
हे सहजच पटेल असं नक्कीच वाटत नाही, यात मोठी डील झालीय अशीच चर्चा आता मतदारसंघात, जनतेत सुरू आहे.

कालपर्यंत मी भाजपचा निष्ठावंत, कट्टर म्हणणार नेता आज सुमडीत आपल्या पक्षात आला. दादा, नेतेमंडळी पक्ष बदलायला मोकळी असते, पण सतरंज्या उचलणारा कार्यकर्ता एकनिष्ठतेची अग्निपरीक्षा देत असतो. म्हणूनच, आमच्या इथल्या नेत्याची सरड्यासारखी बदललेली भूमिका पाहून वाईट वाटलं. मला आणि माझ्या मतदारसंघातील जनतेलासुद्धा.

उद्याच आजसुद्धा मला माहिती नाही, पण मतदारसंघातील जनता हे विसरणार नाही, हा विश्वासघातकीपणा लक्षात ठेवेल, तुम्हाला कदाचित हे पटलं असेल, पण माझ्या लोकांना हे अजिबात 'पटेल' असं नाही. त्यामुळेच याच निवडणुकीत याचा हिशोब होणार आणि जनताच सुपडासाफ करणार. कारण, आता मी जनतेमध्ये जाऊनच दाद मागणार आहे, आता जनतेलाच विधानसभेचं तिकीट मागणार आहे.

अर्जुनी-मोरगावमतदारसंघाचा,
**स्वाभिमानी जनसेवक**
मनोहर चंद्रिकापुरे

# विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अनिल देशमुख यांचा 'बुक बॉम्ब'

**फडणवीसांवर गंभीर आरोप**

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :** राष्ट्रवादीचे नेते अनिल देशमुख त्यांच्या आत्मचरित्राचे लवकरच प्रकाशन करणार आहेत. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतदानापूर्वीच या पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे अनावरण करण्यात आल्याने या नव्या पुस्तकामुळे नवा वाद निर्माण होऊ शकतो, अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे.




अनिल देशमुख यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप करतानाच अँटिलिया प्रकरण, ईडी प्रकरण आणि विरोधकांचे आरोप यावरही अनेक गोष्टी लिहिल्या असल्याचे सांगितले जात आहे. हे पुस्तक महाराष्ट्रात 'बुक बॉम्ब' ठरणार का? या कडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

अनिल देशमुख यांनी तत्कालीन गृहमंत्री असताना पडद्यामागच्या घटना या पुस्तकातून सांण्याचा प्रयत्न केला आहे. त्याला 'होम मिनिस्टरची डायरी' असे नाव देण्यात आले आहे. या बाबत अनिल देशमुख यांनी एका पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये त्यांनी पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे छायाचित्र प्रसिद्ध केले आहे. यात अनिल देशमुख यांनी लिहिले की, प्रत्येक हेडलाईनच्या मागे एक कथा दडलेली असते. माझ्या राजकीय आत्मकथेत लपलेले धक्कादायक सत्य आणि खुलासे नक्की जाणून घ्या. देशाच्या राजकारणात खळबळ उडवून देईल अशा माझ्या पुस्तकाचं कव्हर पेज शेअर करत आहे!'

कव्हर पेजच्या वर्णनात असे लिहिले आहे की, होम मिनिस्टरची डायरी हे एक रोमांचकारी आत्मचरित्र आहे, ज्यामध्ये ज्येष्ठ राजकीय नेते अनिल देशमुख यांनी त्यांच्या आयुष्यातील सर्वात आव्हानात्मक टप्पा उघड केला आहे.

कोविडच्या काळात मुकेश अंबानी यांच्या घरासमोर स्फोटकांनी भरलेले वाहन सापडल्याची घटना संपूर्ण देशाला हादरून गेली तेव्हापासून या संघर्षाची कहाणी सुरू होते.

पुस्तकात अनिल देशमुख यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर मोठे आरोप केले आहेत. ह्यउद्धव ठाकरे आणि त्यांचे पुत्र आदित्य ठाकरे, अजित पवार आणि अनिल परब यांच्याविरोधात बनावट प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी माझ्यावर दबाव आणण्यात आला, फडणवीसांना माझा वापर केला, असे अनेक आरोप या पुस्तकात आहेत .

# महाराष्ट्राला डाकूंपासून वाचवणे महत्त्वाचे..

**पटोले यांचा महायुतीवर घणाघात**



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २४ :** काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी गुरुवारी पुन्हा एकदा महाविकास आघाडीच्या मुख्यमंत्रीपदाच्या संभाव्य उमेदवारावर चर्चा करणे तूर्त व्यर्थ असल्याचे स्पष्ट केले. मुख्यमंत्रीपदावर आताच चर्चा करणे व्यर्थ आहे. सध्या महाराष्ट्राला डाकू लोकांपासून वाचवणे सर्वात महत्त्वाचे आहे, असे ते महायुतीवर घणाघात करताना म्हणालेत.

महाराष्ट्रात 20 नोव्हेंबर रोजी विधानसभेच्या 288 जागांसाठी निवडणूक होणार आहे. या पार्श्वभूमीवर सत्ताधारी महायुती व विरोधी बाकावरील महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार कोण? अशी चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली आहे. याविषयी गुरुवारी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना छेडले असता या मुद्यावर आताच चर्चा करण्याची काहीच गरज नसल्याचे स्पष्ट केले.

नाना पटोले म्हणाले, महाविकास आघाडीचा विधानसभेच्या जागावाटपाचा फॉम्युर्ला ठरला आहे. उमेदवारही घोषित होत आहेत. त्यामुळे सध्या तरी महाविकास आघाडीचा मुख्यमंत्री कोण? यावर चर्चा करणे योग्य नाही. या मुद्यावर चर्चा करणे तूर्त व्यर्थ आहे. आम्ही सध्या राज्याला वाचवण्याचे काम करत आहोत. महाविकास आघाडीतील सर्वच घटकपक्ष एकमेकांसोबत मिळून काम करत आहेत. लोकांमधून आमदार निवडून आल्यानंतर मुख्यमंत्री ठरतो. त्यामुळे यासंबंधीची चर्चा थांबवण्याची गरज आहे.

मंत्री चंद्रकांत पाटील यांनी 24 नोव्हेंबर रोजी महायुतीचा मुख्यमंत्री शपथ घेईल असा दावा केला आहे. याविषयी नाना पटोले यांना छेडले असता, त्यांनी त्यांचा चांगलाच समाचार घेतला. ते म्हणाले, महायुतीमध्ये काय सुरू आहे हे चंद्रकांत पाटलांनाच माहिती आहे. त्यांच्या महायुतीचा दरबार दिल्लीला गेला आहे. या आघाडीमध्ये शेवटपर्यंत चर्चा करून वाटाघाटीतून प्रश्न सुटतील.

चंद्रकांत पाटलांनी मुख्यमंत्री पदाचे नाव सांगितले का? हे डाकू लोक आहेत. भाजप आता म्हणत आहे आमचे सरकार येणार. मुख्यमंत्री महायुतीचा होणार. त्यावरून त्यांची भूमिका दिसून येत आहे. अजून काहीच ठरले नाही. मतदानही झाले नाही. हे लोक जनतेच्या मतावर डाका टाकणारे आहेत, असे पटोले म्हणाले.

# शरद पवार राष्ट्रवादीच्या पहिल्या यादीत विदर्भातील ७ उमेदवारांचा समावेश

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :** महाविकास आघाडीमधील शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसने गुरूवारी त्यांच्या ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली . त्यात विदर्भातील ७ उमेदवारांचा समावेश आहे .

अनिल देशमुख, राजेंद्र शिंगणे, सम्राट डोंगरदिवे, दुनेश्वर पेठे, रविकांत बोपचे, भाग्यश्री आत्राम आणि चरण वाघमारे या सात उमेदवारांची वर्णी लागली आहे.

विधानसभेच्या विदर्भातील ६२ पैकी किती आणि कोणते मतदारसंघ शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला येणार? याबाबत अद्याप अंतिम निर्णय झाला नाही . परंतु, सद्यःस्थितीत ७ मतदारसंघ वाट्याला आले आहेत . अहेरी मतदारसंघात अजित पवार गटाचे धर्मरावबाबा आत्राम यांच्या विरोधात त्यांची कन्या भाग्यश्रीला उमेदवारी देण्यात आली असून, ज्या ज्या मतदारसंघात अजित पवार राष्ट्रवादीचा उमेदवार असेल तेथे शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसने दंड थोपटल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.



दुनेश्वर पेठे हे सुरूवातीपासूनच शरद पवार यांच्याशी एकनिष्ठ राहिले आहेत. सव्वा वर्षापूर्वी राष्ट्रवादीत फुट पडल्यानंतर त्यांनी अजित पवार गटात जाण्याऐवजी शरद पवार यांच्या गटात राहणे पसंत केले. नागपूर पूर्व मतदारसंघातून उमेदवारीसाठी महाविकास आघाडीमध्ये काँग्रेसकडून संगिता तलमले यांच्यासह अनेकांनी मोर्चेबांधणी केली होती. अखेर हा मतदारसंघ शरद पवार गटाला सोडण्यात येवून दुनेश्वर पेठे यांना त्यांच्या निष्ठेचे बक्षिस मिळाले आहे.



भंडारा जिल्ह्याच्या तुमसर मतदारसंघातून अखेर चरण वाघमारे यांना शरद पवार गटाची उमेदवारी मिळाली आहे. २०१४ मध्ये त्यांनी भाजपाकडून निवडणूक जिंकली होती. मात्र, २०१९ मध्ये त्यांना पक्षाने डावलल्याने वाघमारे अपक्ष लढले आणि राष्ट्रवादीच्या राजू कारेमोरे यांच्याकडून पराभूत झाले. गतवर्षी वाघमारे यांनी केसीआर यांच्या बीआरएस पक्षात प्रवेश केला होता. मात्र, तेलंगणात बीआरएसचा सुपडासाफ झाल्याने त्यांनी हाही पक्ष सोडला. शरद पवार गटात त्यांच्या प्रवेशाने या पक्षाच्या जिल्हाध्यक्षासह अनेकांनी विरोध दर्शवत पक्ष सोडण्याचाही इशारा दिला होता. तथापि, पक्षाने अखेर चरण वाघमारे यांनाच उमेदवारी दिली आहे. आता तुमसर विधानसभेत राष्ट्रवादी विरूद्ध राष्ट्रवादी असा मुकाबला रंगणार आहे.

| | |
|---|---|
| जयंत पाटील - इस्लामपूर | दिलीप घोडपे - जामनेर |
| अनिल देशमुख - काटोल | रोहिणी खडसे - मुक्ताईनगर |
| राजेश टोपे - घनसांगवी | सम्राट डोंगरदिवे - मूर्तीजापूर |
| बाळासाहेब पाटील - कराड उत्तर | दुनेश्वर पेठे - नागपूर पूर्व |
| जितेंद्र आव्हाड - मुंब्रा कळवा | रविकांत बोपचे - तिरोडा |
| शशिकांत शिंदे - कोरेगाव | भाग्यश्री आत्राम - अहेरी |
| जयप्रकाश दांडेगावकर - वसमत | रुपकुमार ऊर्फ बबलू चौधरी - बदनापूर |
| गुलाबराव देवकर - जळगाव ग्रामीण | सुभाष पवार - मुरबाड |
| हर्षवर्धन पाटील - इंदापूर | राखी जाधव - घाटकोपर पूर्व |
| प्राजक्त तनपुरे - राहुरी | देवदत्त निकम - आंबेगाव |
| अशोकराव पवार - शिरुर | युगेंद्र पवार - बारामती |
| मानसिंगराव नाईक - शिराळा | संदीप वरपे - कोपरगाव |
| सुनील भुसारा - विक्रमगड | प्रताप ढाकणे - शेवगाव |
| रोहित पवार - कर्जत जामखेड | राणी लंके -पारनेर |
| विनायकराव पाटील - अहमदपूर | मेहबूब शेख - आष्टी |
| राजेंद्र शिंगणे - सिंदखेड राजा | नारायण पाटील - करमाळा |
| सुधाकर भालेराव - उदगीर | महेश कोठे - सोलापूर शहर उत्तर |
| चंद्रकांत दानवे - भोकरदन | प्रशांत यादव - चिपळूण |
| प्रदीप नाईक - किनवट | समरजित घाटगे - कागल |
| विजय भांबळे - जिंतूर | रोहित आर. पाटील - तासगाव - कवठेमहांकाळ |
| पृथ्वीराज साठे -केज | चरण वाघमारे - तुमसर |
| संदीप नाईक - बेलापूर | प्रशांत जगताप - हडपसर |
| बापूसाहेब पठारे - वडगाव शेरी | |

# मराठी चित्रपट क्षेत्रात नवी क्रांती

**लोकमानस**



पद्मालय टेलिफिल्म्स लिमिटेड, जो मुंबईच्या भांडवली बाजारात सूचीबद्ध आहे, हैदराबाद स्थित एक चित्रपट उत्पादनगृह आहे आणि त्यांनी मुंबईच्या मराठी चित्रपट उद्योगात महत्त्वाची क्रांती आणण्याची योजना तयार केली आहे.

कंपनीचे कार्यकारी संचालक, जी. व्ही. नरसिंह राव, यांनी अलीकडेच प्रख्यात दिग्दर्शक आणि निर्माता श्रेयस जाधव यांच्यासोबतच्या सहयोगाची घोषणा केली आहे. गणराज स्टुडिओच्या श्रेयस जाधव यांच्यासोबत मिळून २०२५-२६ मध्ये सुमारे ६ ते ७ चित्रपट निर्मिती व प्रदर्शित करण्याची योजना आहे.

याशिवाय, पद्मालय टेलिफिल्म्स लिमिटेड मुंबईतील गजानन स्टुडिओमध्ये सर्व पोस्ट प्रोडक्शन प्रक्रिया पार पाडेल. संगीत आणि मनोरंजन उद्योगात विस्तारीकरणाच्या योजनाही आहेत. महाभारत आणि रामायण सारख्या पौराणिक पॅन-इंडिया चित्रपटांच्या पोस्ट कामासाठी ते सहयोग करतील, ज्यामुळे चित्रपट उद्योगाला नवी दिशा मिळेल.

श्रेयस जाधव मराठी मनोरंजन क्षेत्रातील एक महत्त्वाचे नाव आहे. त्यांनी फकाट, ऑनलाइन बिनलाइन, मी पण सचिन, बघतोस काय मुजरा कर, बस स्टॉप यांसारखे उल्लेखनीय चित्रपट दिग्दर्शित आणि निर्मित केले आहेत, ज्यामुळे मराठी सिनेमा समृद्ध झाला आहे.

त्यामुळे पद्मालय टेलिफिल्म्सने श्रेयस जाधवच्या गणराज स्टुडिओसह सहयोग करण्याचा निर्णय एक रणनीतिक पाऊल आहे, जे उच्च-गुणवत्तेचे चित्रपट व मालिकांचा पुरवठा करतील आणि नवोदितांसाठी एक व्यासपीठ प्रदान करतील. या उपक्रमात मराठी व हिंदी दोन्ही प्रोजेक्ट्सचा समावेश असेल, ज्यावर काम एप्रिल २०२५ मध्ये सुरू होईल. ■ ■

## पौर्णिमेचा फेरा' भयभीत करणारी वेबसिरीज प्रदर्शित




शुभम प्रोडक्शन फिल्म्स प्रस्तुत 'पौर्णिमेचा फेरा' ही हॉरर कॉमेडी वेबसीरिज प्रेक्षकांच्या भेटीला आली असून शुभम प्रोडक्शन फिल्म्सच्या युट्युब चॅनेलवर ही वेबसिरीज झळकली आहे.

शुभम प्रोडक्शन फिल्म्स प्रस्तुत 'पौर्णिमेचा फेरा' या वेबसिरीजची निर्मिती पायल गणेश कदम यांनी केली असून अजय सरतपे दिग्दर्शित या सीरिजमध्ये निखिल बने, मंदार मांडवकर, सिद्धेश नागवेकर, संजय वैद्य, प्राची केळुस्कर, संदीप रेडकर, दीपा माळकर, चंदनराज जामदाडे, स्नेहल आयरे, दर्शना पाटील यांच्या प्रमुख भूमिका आहेत. शुभम विलास कदम यांची कथा असलेल्या या सीरिजचे संवाद, लेखन संदेश लोकेगावकर यांनी केले आहे.

या सीरिजमध्ये तीन मित्र त्यांच्या मित्राच्या कोकणातील वडिलोपार्जित घरी भेट देतात. कोकणातला त्यांचा हा प्रवास, यादरम्यान घडलेली घटना, त्यात दडलेली रहस्ये यात पाहायला मिळणार आहेत. ही रहस्ये काय असतील? पौर्णिमेच्या चंद्राचा आणि या घटनांचा काय संबंध असेल, असे अनेक प्रश्न प्रेक्षकांच्या मनात निर्माण झाले असतील तर या सगळ्याची उत्तरे ही वेबसिरीज पाहून मिळतील.

या वेबसीरिजचे चित्रीकरण मुंबईमधील काही भागांत आणि कोकणातील गुहागर येथे झाले आहे. याबद्दल पायल कदम म्हणाल्या , या वेबसीरिजचा जॉनर हॉरर कॉमेडी असून हा जॉनर प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहे. 'पौर्णिमेचा फेरा' चे वैशिष्ट्य म्हणजे या कथेत रहस्य, रोमांच, भीती असतानाच त्याला कॉमेडीचा टच देण्यात आला आहे. खात्री आहे ही सीरिज प्रेक्षकांच्या पसंतीस उतरेल. ■ ■

## सन मराठीवरील आदिशक्ती मालिकेतील शक्तीचा नवा प्रवास





सन नेटवर्कच्या सन मराठी वाहिनीवरील आदिशक्ती ही मालिका पहिल्या एपिसोडपासून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. प्रत्येक भागात कथेला एक वेगळं रुप मिळत गेल्यामुळे प्रेक्षक या मालिकेशी जोडले गेले आहे.

आता या मालिकेचं नवीन पर्व सुरु होणार आहे.'आदिशक्ती' मालिकेतील ८ वर्षांची शक्ती आता मोठी होणार असून मालिकेच्या कथानकाचा नवीन प्रवास सुरू होणार आहे. मोठ्या शक्तीची भूमिका अभिनेत्री राजसी चिटणीस साकारणार आहे तर शक्तीची साथ शिवा हे पात्र देणार आहे जे अभिनेता अतुल आगलावे साकारणार आहे.

शक्ती कुठे व कोणासोबत राहते? शक्तीच्या नव्या विश्वात तिच्यासह कोण-कोण असणार? शक्तीच्या कठीण प्रसंगात शिवा साथ देणार का? शिवा- शक्तीचं नातं कस उलगडणार? शक्तीला पडलेल्या प्रश्नांची उत्तर ती शोधू शकेल का? या सर्व प्रश्नांची उत्तरं लवकरच या नवीन पर्वात उलगडतील. शिवशक्तीचा हा नवा प्रवास पाहण्यासाठी, बघत रहा आदिशक्ती २१ ऑक्टोबरपासून सोमवार ते शनिवार रात्री ८:३० वाजता फक्त सन मराठी वाहिनीवर. ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

# ६५ उमेदवारांच्या यादीतून शिवसेनेची काँग्रेसवर कुरघोडी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :** महाविकास आघाडीतील ठाकरे गटातर्फे ६५ उमेदवारांची पहिली यादी बुधवारी जाहीर केली होती. ही यादी जाहीर करून शिवसेना ठाकरे गटाने कुरघोडी केली आहे. यादी प्रसिद्ध झाल्यानतंर महाविकास आघाडीच्या पत्रकार परिषदेत खासदार संजय राऊत यांनी या यादीत थोडासा बदल होणार असल्याचे सांगितले होते.त्यानंतर आज दैनिक सामनामध्ये फोटोसह प्रसिध्द केलेल्या यादीत एक नाव वगळण्यात आले असून ६४ उमेदवारांची नावे आहेत.

वगळण्यात आलेले हे नाव रणजीत ज्ञानेश्वर पाटील यांचे आहे. उस्मानाबाद (धाराशिव) मधील परांडा विधानसभा मतदार संघातून त्यांचे नाव जाहीर करण्यात आले होते. या ठिकाणी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचा उमेदवार दिला जण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राहुल मोटे यांचे नाव चर्चेत आहेत. ते सलग तीन वेळा परांडा विधानसभा मतदार संघातून आमदार राहिले आहेत. अशा प्रकारचीच परिस्थिती सोलापूर जिल्ह्यातील सांगोला मतदार संघातून जाहीर उमेदवार मागे घेण्याची परिस्थिती ठाकरे गटावर येणार आहे. रामटेक विधानसभा मतदारसंघावरून महाविकास आघाडीमध्ये मोठ्या प्रमाणात रस्सीखेच सुरू असताना चर्चे आधीच ठाकरे गटाने उमेदवार जाहीर केल्यामुळे काँग्रेसमध्ये कमालीची नाराजी आहे.

# राज्यभरात शेकडो उमेदवारांचे नामांकन दाखल



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :** विधानसभा निवडणुकीसाठी गुरूवारी गुरूपुष्य पर्वाचा मुहूर्त साधत राज्यभरात अनेक उमेदवारांनी नामांकन सादर केले.

अद्वय हीरे, संतोष बांगर, भागिरथ भालके, रणजीत शिंदे, अर्जुन खोतकर, अविनाश जाधव, राजन विचार, राजू पाटील, सुलभा गायकवाड, वसंत गीते, वैभव नाईक, जयंत पाटील, किरण सामंत, अतुल भातखळकर,मंगलप्रभात लोढा, अमित साटम, मिहिर कोटेचा, भास्कर जाधव, बंटी भांगडिया, विनोद अग्रवाल, संजय राठोड, राधाकृष्ण विखे पाटील, हीरामण खोसकर, माणिकराव कोकाटे, नरहरी झिरवळ, राजेश टोपे, संग्राम थोपटे अशा अनेकांनी उमेदवारी अर्ज भरले.

वरळी विधानसभेचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार आदित्य ठाकरे यांनी उमेदवारी नामांकन दाखल केले. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. दिलीप वळसे पाटील यांनी आंबेगाव-शिरूर मतदारसंघासाठ उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. धनंजय मुंडे यांनी आज परळी विधानसभा मतदारसंघातून लाडक्या बहिणी सोबत उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी भाजप नेत्या पंकजा मुंडे, माजी खासदार प्रीतम मुंडे व मतदारसंघातील भगिनी उपस्थित होत्या.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी येवल्यातून उमेदवारी अर्ज भरला आहे. अर्ज भरण्याआधी त्यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन केले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड कळवा-मुंब्रा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरला. यावेळी शरद पवार उपस्थित होते . आर.आर. पाटील यांचे सुपुत्र रोहित पाटील यांनी तासगाव कवठेमहांकाळ मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरला. शरद पवार गटाचे रोहित पवार यांनीही नामांकन सादर केले.

काँग्रेसच्या उमेदवार यशोमती ठाकुर यांनी आज तिवसा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरला. अर्ज भरण्याआधी त्यांच्या कार्यकर्त्यांनी बाईक रॅली काढली. या रॅलीत यशोमती ठाकुर स्वतः दुचाकी चालवत अर्ज भरण्यासाठी गेल्या . काँग्रेसच्या आमदार विनेश फोगाट उपस्थित होत्या. भाजपमधून राष्ट्रवादी शरद पवार गटात गेलेले हर्षवर्धन पाटील यांनी आज दुपारी इंदापूरमधून उमेदवादी अर्ज भरला. यावेळी सुप्रिया सुळे यांची उपस्थिती होती.

भाजपचे कोथरुडमधील उमेदवार चंद्रकांत पाटील यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. त्याआधी त्यांनी जोरदारशक्ती प्रदर्शन केले. रॅली काढण्यापूर्वी त्यांनी पुण्यातील कसबा गणपतीसह विविध मंदिरांमध्ये जाऊन देव दर्शन घेतले. देवदर्शन माझा राजकीय अजेंडा नाही, माझी देवावर श्रद्धा आहे. मी देवाला मानणारा माणून आहे, असे चंद्रकांत पाटील म्हणाले.

महासागर
नागपूर
वृत्तसागर
■ शुक्रवार, दि. २५, ऑक्टोबर २०२४ ■

# अजित पवार गटाच्या आभा पांडेंनी पूर्व नागपुरातून दाखल केली उमेदवारी



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

महाविकास आघाडीत जागा वाटपावरून असंतोष उफाळून आला आहे. नागपूरमध्ये तब्बल तीन मतदारसंघात घमासान सुरू आहे. यातच काँग्रेसचा परंपरागत पूर्व नागपूर मतदारसंघ शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला सोडण्यात आल्याने महाविकास आघाडीत आणखीच वाद पेटला आहे. यावर तोडगा काढला जात असताना काँग्रेसचे इच्छुक उमेदवार, तसेच मागील निवडणुकीत भाजपला झुंजवणारे पुरुषोत्तम हजारे यांनी उमेदवारी अर्ज दाखल करून बंडाचे निशान फडकावले आहे. तर कृष्णा खोपडे यांना हरवायचेच या भावनेने राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या आभा पांडे यांनी गुरूवारी बंडखोरी करीत अपक्ष म्हणून उमेदवारी जाहीर केली आहे.

पूर्व नागपूरमधून भाजपाने विजयाची हॅटट्रिक करणारे कृष्णा खोपडे यांना चौथ्यांदा उमेदवारी दिली आहे. येथून काँग्रेसचे सतीश चतुर्वेदी चार वेळा निवडून आले होते. म्हणून खोपडे यांनाही उमेदवारी देण्यात आली आहे. काँग्रेसचा परंपरागत मतदारसंघ असलेले पूर्व नागपूर राष्ट्रवादी शरद पवार गटाला सुटले. या गटाकडून शहराध्यक्ष दुनेश्वर पेठे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. यामुळे नाराज झालेले काँग्रेसचे पुरुषोत्तम हजारे यांनी बंडखोरी करीत उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

पूर्व नागपुरातून काँग्रेसचे विधान परिषद सदस्य अभिजित वंजारी हेही इच्छुक होते. २०१९ च्या निवडणुकीत खोपडे विरुद्ध हजारे असा सामना रंगला होता. नगरसेवक असलेल्या हजारे यांनी तब्बल ८० हजार मते घेत खोपडेंना तगडी लढत दिली होती. एक लाखांच्या मताधिक्याने निवडून येवू असा दावा त्यांनी केला होता. प्रत्यक्षात खोपडे फक्त २३ हजार मतांनी निवडूण आले. पुन्हा लाढायचे असल्याने हजारे पाच वर्षांपासून संपर्कात होते.

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश सचिव आणि राज्य महिला आयोगाच्या सदस्य आभा पांडे यांनी बंडाचे निशाण फडकावीत उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दाखल झाल्या तेव्हापासूनच आभा पांडे यांनी पूर्व नागपूरमधून निवडणूक लढण्याचा निर्धार केला होता.

यावरून पूर्व नागपूरचे दावेदार तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष दुनेश्वर पेठे यांच्यासोबत त्यांचे खटके उडत होते. अजित पवार चाळीस आमदार घेऊन महायुतीत सहभागी झाले तेव्हा त्या त्यांच्यासोबत गेल्या. पेठे यांनी शरद पवार यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतल्याने आभा पांडे यांचे पक्षांतर्गत विरोध आपसूकच संपला होता. मात्र हा मतदारसंघ भाजपचा असल्याने तो राष्ट्रवादीसाठी सुटणार नाही हे जाहीर होते. असे असले तरी आभा पांडे यांनी पक्षाने उमेदवारी दिली तरी नाही दिली तरी निवडणूक लढणारच हे दोन महिन्यांपूर्वीच जाहीर केले होते.

# पंधरा वर्षापासून हरवलेल्या वृद्धाला कुटुंबाचा शोध घेऊन केले स्वाधीन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

सुमारे 15 वषार्पासून घरातून बेपत्ता झालेल्या आणि घरच्यांनी निधन झाले म्हणून सोडून दिलेल्या एका 75 वर्षीय वृद्धाला अंबाझरी पोलिसांनी त्याच्या कुटुंबाचा शोध घेऊन स्वाधीन केले. खाकी वदीर्तील या संवेदनशीलतेने सारेच गहीवरले...

पंधरा वर्षांपूर्वी हरवलेल्या या वृद्धाला घरच्यांनी प्रारंभी आजूबाजूच्या परिसरात शोधले. आणि सापडत नाही म्हटल्या नंतर शोध थांबवला. मात्र पोलिसांत हरवल्याची तक्रार केली नव्हती. त्याला दारूचे व्यसन होते. घरच्यांनी कागदपत्रावरून सुद्धा त्याचे नाव काढून टाकले होते व मयत झाला असे समजून व्यवहाराला लागले होते.

सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती किरण मुंदडा यांनी अंबाझरीचे थानेदार विनायक गोल्हे यांच्या मोबाईलवर फोन करून रामनगर चौक बस स्टॉपच्या बाजूला एक वयोवृद्ध आजारी इसम पडलेला असून त्याच्यावर उपचार केले नाही तर त्याचा मृत्यू होऊ शकतो. कृपया अॅम्बुलन्सची सोय करा अशी विनंती केल्याने तत्काळ स्वतः ठाणेदारासह अंबाझरी पोलीस ठाण्याचा स्टाफ तिथे पोहोचला. आजारी व्यक्तीला तत्काळ पोलिस वाहनाने उपचार करिता मेयो हॉस्पिटल येथे रवाना केले. त्याला त्याचा नाव पत्ता विचारले असता नामदेव सिताराम हाडेकर (वय 75, राजीव नगर) असे सांगितले.

मेयो हॉस्पिटल येथील मेडिकल ऑफिसर यांच्याशी बोलून त्याच्या सर्व वैद्यकीय तपासण्या करून त्यास तीन दिवस अॅडमिट ठेवले व बरे झाल्यानंतर घरचा पूर्ण पत्ता माहित नसल्याने त्यास बेघर शेलटर होम येथे पाठविले. त्याला चालता येत नसल्याने त्यांनी घेण्यास नकार दिला.

त्यावरून आजारी इसमाने दिलेल्या अर्धवट माहितीच्या आधारे पोलिस पथकाने त्याचा पत्ता हिंगणा एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीत राजीवनगर येथे शोधण्यास सुरूवात केली. अवघ्या 2 तासांच्या आत पोलिसांनी त्याचा पत्ता शोधून त्याचा मुलगा योगेश नामदेव हाडेकर वय 52, पत्नी द्रोपदाबाई वय 70, यांच्या ताब्यात दिले.

ठाणेदारांनी त्याला घालण्यासाठी नवीन कपडे व खाऊ दिला. सोबतच खचार्साठी पैसे सुद्धा दिले व यापुढेही काही अडचण आल्यास निसंकोच संपर्क साधण्याबाबत सांगितले.

# नागपूर येथे उत्तरायण-२०२४ प्रशिक्षण वर्गाचा समारोप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :


अधिका-यांमधून नव्याने बढती मिळणा-या अधिका-यांना भारतीय महसूल सेवेतील सहायक आयुक्त या पदासाठी व कर प्रशासनाच्या व्यवस्थापनासाठी राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी, नागपूर येथे दिल्या जाणा-या 'उत्तरायण-2024' या प्रशिक्षणवर्गाच्या समारोप समारंभाचे आज 25 ऑक्टोबर शुक्रवार रोजी सकाळी 11.30 वाजता आयोजन करण्यात आले आहे. या समारोप समारंभास सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती विकास शिरपूरकर हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहतील. राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी ही भारतीय महसूल सेवेतील (आय.आर.एस.) अधिका-यांना प्रशिक्षण देणारी अग्रणी संस्था आहे. 7 आठवडे चाललेल्या या प्रशिक्षणात प्रत्यक्ष कर वसुली व करचुक वेगिरीला आळा घालण्याच्या प्रमुख कार्याच्या प्रशिक्षणा शिवाय अधिका-यांना पैशाच्या गैर व्यवहारासारख्या आर्थिक गुन्हे व विविध आर्थिक घोटाळे यांचा सामना करण्यासाठी सक्षम केले जाते. प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थी अधिका-यांच्या शारिरिक सुदृढतेवरही पुरेसा भर दिला जातो. अकादमीमध्ये असणा-या व्यायामशाळा, आधुनिक जलतरण तलाव व उत्कृष्ट क्रीडा सुविधांचा वापर करण्यासाठी अधिका-यांना प्रोत्साहन दिले जाते. निवासी प्रशिक्षण कार्यक्रमानंतर एक आठवडा भारत-दर्शन आणि प्रत्यक्ष कामाच्या प्रशिक्षणाची संधीही या अधिका-यांना मिळते. समारोप समारंभाला नागपूर आयकर विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

## प्राणघातक हल्ला करणारा आरोपी अटकेत

**नागपूर :** नागपूर शहरातील तहसील पोलीस स्टेशन हद्दीतील जुना भंडारा रोड येथे 23 ऑक्टोबर रोजी खुनाचा प्रयत्न केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. काही तरुणांनी परिसरात गोंधळ घातला असता लेखराज श्रीवास नावाच्या व्यक्तीने त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. याचा राग येऊन आरोपी मोहतसीम अब्दुल रज्जाक शेख याने लेखराजला धमकी दिली.

त्यानंतर आरोपीने त्याच्या घरी जाऊन तेथून चाकू घेऊन लेखराजच्या घरी जाऊन लेखराजवर हल्ला केला त्यात तो गंभीर जखमी झाला. जखमी लेखराजला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांनी लवकरच आरोपीला अटक केली. चाकू जखमीच्या घरातून नाही तर आरोपीच्या घरातून आणला होता. पोलिसांनी आरोपीविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# जखमेवर आता बँडेज नव्हे तर लावा कृत्रिम त्वचा



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २४ :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मॉलिक्युलर बायोलॉजी विभागातील संशोधकांनी अँटीमायक्रोबियल गुणधर्म असलेली कृत्रिम त्वचा शोधून काढली आहे. संशोधकांच्या संशोधनामुळे आता जखमेवर मलमपट्टी न करता कृत्रिम त्वचाच लावता येणार आहे. विद्यापीठाच्या मॉलिक्युलर बायोलॉजी विभाग प्रमुख डॉ. दयानंद गोगले आणि लिटूच्या बायोटेक्नॉलॉजी विभाग प्रमुख डॉ. आरती शनवारे यांनी प्रकल्प प्रमुख डॉ. बिपिन लाडे यांच्या मदतीने हे संशोधनकार्य पूर्ण केले आहे.

जखम झाली की मलम लावत पट्टी बांधायची अशी वषार्नुवर्षे पद्धत आहे. मात्र, या मलमपट्टी ऐवजी विद्यापीठाच्या संशोधकांनी निर्माण केलेली कृत्रिम त्वचा जखमेवर लावता येणार आहे. जखम झालेल्या जागेवर पट्टीच्या ऐवजी या कृत्रिम त्वचेचा तुकडा लावल्याने जखम सुकेल आणि बरी होईल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या औषधीय घटकांचा वापर या कृत्रिम त्वचेत करण्यात आला आहे.

या त्वचेमुळे जखम झाकली जाईल आणि बरीही होईल. जखम झालेल्या ठिकाणी कमी वेळात नैसर्गिक त्वचा येण्यासही या संशोधनामुळे शक्य होणार आहे. सोबतच ही त्वचा जैवविघटनशील असल्याने जखमेवर काढून टाकल्यानंतरही ती आपोआप विघटित होईल आणि त्यातून दीर्घकाळ टिकणाऱ्या कचऱ्याचा प्रश्नही निर्माण होणार नाही असा दावा संशोधकांनी केला आहे.

राजीव गांधी जैविक तंत्रज्ञान (आरजीबीसी) प्रकल्प अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील पदव्युत्तर वनस्पती विभागाने संक्रमण रोखण्यासाठी आणि जखमांच्या बरे होण्यासाठी अँटीमायक्रोबियल गुणधर्म असलेली नवीन कृत्रिम त्वचा विकसित करण्याबाबत २०१९-२०२० मध्ये संशोधनास सुरुवात केली. या नावीन्यपूर्ण संशोधनाकरिता आवश्यक सामग्रीत सोडियम अल्जिनेट, जिलेटिन, किटोसन आणि अँटीमायक्रोबियल एजंट यांचा समावेश आहे. यामुळे उच्च दर्जाच्या जखमा लवकर बरी होण्याकरिता मदत मिळेल. बायोटेक्नोलॉजीचे विद्यार्थी आकाश कांदी यांनी संशोधन कार्यात सहभाग घेतला.

जखमांवर मलमपट्टी करण्याची वषार्नुवषीर्ची पद्धत अनेकदा संक्रमण रोखण्यात अपयशी ठरते. त्यामुळे या समस्यांवर उपाय म्हणून संशोधकांनी सोडियम अल्जिनेट, जिलेटिन आणि किटोसन यांचा वापर करून कृत्रिम त्वचा तयार केली. संशोधकांनी पर्यावरणास अनुकूल अशा घटकांचा वापर केला. कृत्रिम त्वचा ही नैसर्गिक त्वचेसारखी दिसू शकते. यातील नैसर्गिक गुणधर्म जंतूंना मारत संक्रमण रोखण्यास मदत करते. संशोधकांनी निर्माण केलेली कृत्रिम त्वचा ही नैसर्गिक त्वचे करिता हानिकारक नसल्याचे विविध चाचण्यांमधून दिसून आले. अँटीमायक्रोबियल गुणधर्म असल्याने जखम लवकर सुकत बरी होण्यास मदत मिळणार आहे. याकरिता कृत्रिम त्वचेमध्ये समाविष्ट असलेल्या विविध औषधी गुणधर्म जखम लवकर बरी करण्याची क्षमता आहे.

# तडीपार महिला गजाआड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

गुन्हे शाखा युनिट 5 च्या पथकाने गुन्हेगार तपासणी मोहिमेदरम्यान एका तडीपार महिला गुन्हेगाराला विना परवानगी परिसरात फिरताना अटक केली. आरती अनिल खरे (35) रा. मार्टिननगर असे अटकेतील महिलेचे नाव आहे. आरतीविरुद्ध अवैधरित्या दारूविक्री आणि परिसरातील कायदा-सुव्यवस्था बिघडवण्यासह इतर गुन्हेही नोंद आहेत. तिच्यावर अंकुश लावण्यासाठी झोन 5 च्या डीसीपींनी 10 मे 2024 रोजी तिला एक वषार्साठी नागपूर जिल्ह्यातून तडीपार केले होते. बुधवारी रात्री गुन्हे शाखेच्या पथकाने गुन्हेगार तपासणी मोहीम राबविली होती. या दरम्यान मार्टिननगर परिसरात पोलिसांनी आरतीला विना परवानगी परिसरात फिरताना पकडले. तिला अटक करून पुढील कार्यवाहीसाठी जरीपटका पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले.

# चहावाल्याकडून मिळाले ८ लाख रुपये

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :



चहाचे दुकान चालवणाऱ्या तरुणाकडे 8 लाख रुपये सापडले आहेत. आदर्श आचार संहितेअंतर्गत रोख रक्कम वसूल करण्याची ही पहिलीच कारवाई आहे. निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार पोलिसांचे पथक ठिकठिकाणी वाहनांची तपासणी करत आहे. याच क्रमाने महाराजबाग चौक ते विद्यापीठ ग्रंथालय चौकापर्यंत सीताबर्डी पोलिसांच्या पथकाला एक दुचाकीस्वार संशयास्पद अवस्थेत दिसला.

पोलीस पथकाने चौकशी केली असता दुचाकीस्वाराने आपली ओळख 50 वर्षीय उमेश रामसिंग एडवान, रेणू कॉर्नर, मानेवाडा अशी दिली. दुचाकीच्या ट्रंकची झडती घेतली असता त्यात ५०० आणि २०० रुपयांच्या नोटा आढळून आल्या. या नोटांबाबत उमेशकडे चौकशी केली असता तो समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. पोलिसांनी उमेशला पोलिस ठाण्यात आणले असता, 500 रुपयांच्या 1559 नोटा आणि 200 रुपयांच्या 70 नोटा सापडल्या. या नोटांची रक्कम 7 लाख 93 हजार 500 रुपये आहे. पोलिसांनी ही रोकड जप्त करून पश्चिम नागपूर विधानसभेच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सोपवली.

उमेश चहाचे दुकान चालवतो. एवढी मोठी रक्कम मिळाल्यामुळे तो हवालासाठी काम करत असल्याचा पोलिसांना संशय आहे. डीसीपी राहुल मदने यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

# गुंडाचा तरुणावर जीवघेणा हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

घरासमोर शिविगाळ करण्यासाठी फटकारले असता अल्पवयीन आरोपीने गुंड भावासोबत मिळून तरुणावर चाकूने जीवघेणा हल्ला करीत गंभीर जखमी केले. लेखराज उत्तम श्रीवास (26) रा. हंसापुरी असे जखमीचे नाव आहे. आरोपींमध्ये मोहतसीम अब्दुल रज्जाक (19) रा. कसाबपुरा आणि त्याच्या 17 वर्षीय अल्पवयीन भावाचा समावेश आहे.

लेखराज हा हंसापुरीत बंडू हाडवैद्यच्या दवाखान्याजवळ राहतो. बुधवारी रात्री 11.30 वाजताच्या सुमारास लेखराज घरी बसलेला होता. दरम्यान बाहेरून शिविगाळ आणि मोठ-मोठ्याने बोलण्याचा आवाज ऐकू आला. लेखराज बाहेर निघाला असता अल्पवयीन व त्याचे मित्र गोंधळ घालताना दिसले. त्याने अल्पवयीनला फटकारत तेथून हाकलले. पाहून घेण्याची धमकी देत अल्पवयीन तेथून निघाला. घरी जाऊन त्याने भाऊ मोहतसीम याला भांडण झाल्याचे सांगितले. मोहतसीम चाकू घेऊन हंसापुरीत पोहोचला.

लेखराजला आवाज देत घराबाहेर बोलावले आणि शिविगाळ सुरू केली. विरोध केला असता त्याने चाकूने लेखराजच्या छाती आणि हातावर वार करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला आणि दोघेही फरार झाले. लेखराजने घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिस त्याला उपचारार्थ मेयो रुग्णालयात घेऊन गेले. खुनाच्या प्रयत्नासह विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून मोहतसीम आणि अल्पवयीनला ताब्यात घेतले.

# लाडकी बहीणचा प्रचार झाला

## आता कोण बहिणी आणि कुठल्या कोण?

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २४ :

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूकीत सत्ताधाऱ्यांची विजयाची आशा 'लाडकी बहीण' या योजनेवरच आहे. अधिक प्रमाणात सर्वच प्रस्थापित पक्षांकडून महिला सक्षमीकरणाबाबत मोठमोठे दावे करण्यात येतात. मात्र प्रत्यक्ष उमेदवारी देताना मात्र आवरता हात घेतला जातो.

नागपूरचा इतिहास तरी तसाच आहे. अगदी ताजं उदाहरण 'लाडकी बहीण' योजनेचं आहे.लाडकी बहीण' योजनेच्या प्रचार-प्रसारासाठी, मोठमोठ्या सभांसाठी बहिणींनी कामं केली. बहिणींनीच उन्हातान्हात गर्दी केली. पण राजकारणातील 'लाडकी बहीण' ही केवळ प्रचारासाठीच आहे की काय असा सवाल उपस्थित होऊ लागला आहे. नागपूरसारख्या शहराचा इतिहास तपासला, तर काँग्रेस-भाजपने फारच कमी प्रमाणात महिलांना प्रतिनिधित्व दिले आहे.

यंदाच्या निवडणुकीतदेखील यात फारसा बदल होईल असे चित्र नाही. त्यामुळे महिला वर्गात नाराजीचा सूर आहे. 1962 ते 2024 या कालावधीत नागपूरने एकूण 13 विधानसभा निवडणुका पाहिल्या. आता 14 व्या निवडणुकीला शहर सामोरे जात आहे. 2019 पर्यंतच्या उमेदवारांची रिंगणात उतरलेल्यांची संख्या 1 हजार 27 इतकी ठरली.

### फक्त दोन महिला विधानसभेत

62 वर्षांत 63 महिलांनी निवडणूक लढवली व केवळ दोघीच विधानसभेत पोहोचल्या. डॉ. सुशीला बलराज व दमयंतीबाई देशभ्रतार वगळता एकाही महिला उमेदवाराला विधानसभेत पोहोचण्यात यश आले नाही. जनसंघाकडून पहिल्याच निवडणुकीपासून सुमतीताई सुकळीकर यांनी किल्ला लढविला होता. मर्यादित मनुष्यबळातदेखील त्यांनी सलग चार वेळा निवडणूक लढविली.1962 साली नागपूर मतदारसंघ व त्यानंतर 1967, 1972 व 1978 (जनता पार्टी) मध्ये नागपूर पश्चिममधून त्या उभ्या राहिल्या. परंतु चारही वेळा त्यांना विजयश्रीने हुलकावणीच दिली.

त्यानंतर भाजपची स्थापना झाली व भाजपने एकाही महिला उमेदवाराला शहरातून आजपर्यंत तिकीट दिलेले नाही. राजकारणात महिलांना प्रतिनिधित्व देण्याबाबत सर्वच ठिकाणी उदासीनता असल्याचे यातून स्पष्ट होत आहे.यंदा पूर्व नागपूर, पश्चिम नागपूर, मध्य नागपुरातून महाविकास आघाडी व महायुतीकडून काही इच्छुक महिलांची नावे समोर आली आहेत. मात्र, त्यांच्यावर त्यांचे पक्ष विश्वास टाकणार का, हा सवाल कायम आहे.

सद्यस्थितीत मध्य नागपुरातून राष्ट्रवादीच्या पदाधिकारी व महिला आयोगाच्या सदस्या आभा पांडे यांनी निवडणूक लढणार असल्याची घोषणा केली आहे. काही महिला अपक्ष उभ्या होऊ शकतात. मात्र प्रस्थापित पक्षांना महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाबाबत कधी जाग येईल हा सवाल कायम आहे.

# मध्य नागपूरचा पेच; काँग्रेसमध्ये रस्सीखेच

## बंटी शेळकेंना पुन्हा संधी; नंदा पराते, रमेश पुणेकर आग्रही; मुस्लीम समाजही प्रतिक्षेत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

मध्य नागपूरमध्ये भाजपचे विकास कुंभारे यांची धाकधुक वाढली आहे. पण तशीच परिस्थिती काँग्रेसची आहे. कारण कुणाच्या गळ्यात उमेदवारीची माळ घालायची, असा प्रश्न नेत्यांपुढे निर्माण झाला आहे. यामध्ये गेल्यावेळी विकास कुंभारे यांना काट्याची टक्कर देणारे बंटी शेळके यांचे नाव आघाडीवर आहे. त्यांना पुन्हा संधी देऊन विजयासाठी जोरदार प्रयत्न करण्याचा निर्धार काँग्रेस करत आहे. मात्र, त्याचवेळी इतर इच्छुकांनीही नेत्यांपुढे पेच निर्माण केला आहे.

सलग तीन टर्म विकास कुंभारे यांनी मध्य नागपूरचा गड भाजपकडे ठेवला आहे. त्यापूर्वीच्या सात निवडणुका काँग्रेस आणि एक निवडणूक जनता दलाच्या उमेदवाराने जिंकली आहे. त्यामुळे पूर्वी मध्य नागपूर हा काँग्रेसचाच गड मानला जात होता. पण विकास कुंभारे यांच्या रुपात हलबा समाजाला प्रतिनिधित्व मिळाले आणि मध्यचे चित्रच पालटले. आजही हलबा समाजाची 60 हजाराहून अधिक मते मध्य नागपुरात आहेत. पण गेल्या निवडणुकीत कुंभारे यांच्याबद्दलचा भाजपमध्ये असलेला रोष बंटी शेळके यांच्या पथ्यावर पडला. शेळके विजयी झाले नाही. त्यांची कामगिरी दखल घेण्यासारखी ठरली. 2019 मध्ये बंटी शेळके यांचा अवघ्या 4 हजार मतांनी पराभव झाला होता. हा विकास कुंभारे यांच्यासाठी विजयी झाल्यानंतरही मोठा धक्का होता. त्यामुळेच आपली पुढच्या वेळी उमेदवारी धोक्यात आहे, याची जाणीव त्यांना झाली होती. अर्थात त्यामुळेच महाविकास आघाडीकडून बंटी शेळकेच मध्यचे उमेदवार राहतील, हे यंदाही निश्चित होते. पण, नंदा पराते आणि रमेश पुणेकर यांनी हलबा कार्ड समोर केले आहे.

या मतदारसंघात काँग्रेसने हलबा समाजाकडे दुर्लक्ष केल्याची खंत त्यांनी नेत्यांकडे व्यक्त केली आहे.मध्य नागपूरमध्ये मुस्लीम बहुल भाग मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे आसिफ कुरेशी, हैदरअली दोसानी यांनी देखील काँग्रेसकडे उमेदवारीसाठी आग्रह धरला आहे. 11 पैकी 5 निवडणुकांमध्ये काँग्रेसचा मुस्लीम उमेदवार विजयी झाला आहे. 1980 मध्ये याकुब कमर खान, 1985 मध्ये शौकत कुरेशी मध्यमध्ये काँग्रेसचे आमदार होते.

त्यानंतर 1990, 1995 आणि 2004 अशा सलग तीन निवडणुका अनिस अहमद यांनी जिंकल्या. 2001 ते 2009 या कालावधीत ते मंत्रीमंडळातही होते. त्यामुळे यंदा मुस्लीम समाजाला संधी मिळावी, असा आग्रह धरला जात आहे.

# कन्हान पोलिसांचा रुट मार्च

## आचारसंहिता कालावधी मध्ये कोणत्याही प्रकारची परिस्थिती निर्माण झाल्यास पोलीस यंत्रणा सज्ज : पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २४ :



विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर कन्हान पोलीस स्टेशन द्वारे शहरात शिस्तबध्दरितीने रुट मार्च काढण्यात आला असुन आचारसंहिता कालावधी मध्ये कोणत्याही प्रकारची परिस्थिती निर्माण झाल्यास पोलीस यंत्रणा सज्ज असल्याचा इशारा रुट मार्च दरम्यान पोलीसांनी दिला आहे.

विधानसभा निवडणूकच्या अनुषंगाने कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष गायकवाड यांचा मार्गदर्शनात आणि पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा नेतृत्वात शहरात आणि ग्रामीण भागात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि समाजकंटकांवर व गुन्हेगारांवर वचक राहून निवडणुका भयमुक्त वातावरणात पार पडाव्यात आणि मतदारामध्ये विश्वासार्हता वाढीस लागावी याकरिता कन्हान पोलीस स्टेशन हद्दीमध्ये बुधवार ला रूट मार्च काढण्यात आला.

कन्हान पोलीस स्टेशन येथुन सुरु झालेला हा रुट मार्च महामार्ग ने डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, तारसा चौक, सांत नंबर नाका होऊन परत महामार्ग ने गांधी चौक होत कन्हान पोलीस स्टेशन येथे रुट मार्चचे समापन करण्यात आले. रुट मार्च दरम्यान स्थानिक नागरिकांशी संवाद साधुन त्यांना निवडणुक संबधाने मार्गदर्शन करण्यात आले व त्यांना निवडणुक कशी शांततेत पार पडेल.

या बाबत चर्चा करण्यात आली असुन पोलीसांनी निर्भयरित्या मतदान करण्याचा संदेश दिला आहे. या रुट मार्च मध्ये ५ अधिकारी, १६ अमलदार आणि सशस्त्र सीमा बलातील ३ अधिकारी व ३० अंमलदार सहभागी झाले होते.

# रेशन दुकानदार दिवाळीत करणार संप

## काटोल तालुक्यातील राशन दुकानदार संघटनेचे तहसीलदारांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २४ :

प्रतिक्विंटल ३०० रुपये मार्जिनची रक्कम धान्य वितरणासाठी देण्यात यावी, अन्यथा दि १ नोव्हेंबर पासून रेशन पुरवठा बंद करून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा रास्त भाव दुकानदार संघटना काटोल तहसील यांच्या वतीने निवेदनाद्वारे तहसीलदार यांना दिला आहे.



धान्य वाटपाचे प्रती क्विंटल तीनशे रुपये मार्जिन रक्कम दि १ नोव्हेंबर पूर्वी शासनाने जाहीर करून शासन निर्णय आदेश काढावेत. अन्यथा दि १ नोव्हेंबर पासून रास्त भाव दुकानदार राज्यभर धान्य उचल व धान्य वाटप बंद करून बेमुदत संपावर जाण्याचा ठराव करण्यात आला आहे. याबाबत काटोल तहसील स्वस्त धान्य दुकानदार, नागपूर जिल्हा स्वस्त धान्य दुकानदार, व अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार महासंघ व फेडरेशन या दोन संघटनेने एकत्र येऊन दि.१ ऑक्टोबर रोजी अमरावती येथे शिखर परिषद घेण्यात आली होती. या शिखर परिषद मध्ये संयुक्तपणे दोन्ही संघटनेच्या वतीने महाराष्ट्र राज्यातील रास्त भाव दुकानदारांच्या हितासाठी एक मताने दोन्हीही संघटना एकत्रितपणे एकाच वेळी आंदोलन करण्याचे ठरवले आहे. यापूर्वी एका संघटनेने आंदोलन केल्यानंतर दुसरी संघटना त्या आंदोलनास विरोध करत होती. मात्र शासन या दोन संघटनेमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करीत होते. याबाबत तहसीलदार राजू रणवीर यांना तालुका कार्याध्यक्ष रामदास मरकाम यांच्या उपस्थिती मध्ये सचीव-नरेंद्र साळूंके, तुकाराम नाखले, भिमराव गोंडाणे,राजीव मक्कड, बाबा ढोरे, श्रीरंग चिचमालापूरे, युवराज राऊत सह अन्य आदींसह दुकानदार उपस्थित होते.

अमरावती येथील शिखर परिषदेत केला आंदोलनाचा ठराव मार्जिनची रक्कम प्रतिक्विंटल ३०० रुपये देण्यात यावी, या मागणीवर शासनाने आतापर्यंत कसलाही निर्णय घेतला नाही.

राज्यातील दुकानदारांच्या हितासाठी दोन्हीही संघटना एकत्रित शासनाविरुद्ध आंदोलनाची भूमिका घेतली आहे. दि. १ नोव्हेंबर पासून राज्यातील सर्व दुकानदार संपामध्ये जाणार असल्याचा ठराव अमरावती येथे शिखर परिषदेत केला असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# मियावाकी पद्धतीने वृक्षारोपणाचा आयुक्तांच्या हस्ते शुभारंभ



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी उज्वल नगर उद्यान येथे वृक्षारोपण करून मियावाकी पद्धतीने वृक्षारोपणाची सुरुवात केली. नागपूर महानगरपालिका, यंग इंडियन्स नागपूर चॅप्टर आणि सीआयआय नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने उज्वल नगर येथे ४२०० वर्ग फूट जागेमध्ये विविध प्रजातीच्या ७०० पेक्षा जास्त वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे.

मियावाकी वृक्षलागवड पद्धतीमुळे कमी जागेत जास्त वृक्षांची लागवड करता येते. उज्वल नगर उद्यानात गुलमोहर, नीम, बांबू, मोहमनी आणि रेन ट्री यासारख्या वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे.

मुक्ता असोशिएट्सचे महेश गभणे यांनी उद्यानातील मातीची माहिती घेऊन वृक्षांची लागवड केली आहे. एसएमएस कंपनीच्या सौजन्यातून वृक्ष लावण्यात आले असून नागपूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकडून नेमलेले कंत्राटदार स्वप्नील आष्टीकर उद्यानाची देखरेख करणार आहेत. याप्रसंगी उपस्थित परिसरातील नागरिक वसंत खडसे यांनी महापालिका आयुक्तांना सुरक्षा भिंत बांधण्याचा आग्रह केला आणि उद्यानाबद्दल माहिती दिली.

यावेळी मनपाचे उद्यान अधीक्षक अमोल चौरपगार, अभियंता संजय गुजर, यंग इंडियन्सचे अध्यक्ष आदित्य सारडा, उपाध्यक्ष अंकुर चिमा, स्नेहा मोखा, अदिती सिर्सिकर, अंकिता सारडा, श्रेया संचेती, आयुष गांधी आणि इतर उपस्थित होते.

# पोलीस स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

पोलीस स्मृती दिनानिमित्त केंद्रीय राखीव पोलीस दल रेंज कार्यालय नागपूर व डॉ. हेडगेवार रक्त केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये पोलीस उपनिरीक्षक प्रशांत जांभोळकर, एटीसी कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी, अधिनस्त अधिकारी व शिपाई यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. डॉ.हेडगेवार रक्त केंद्राचे सचिव अशोक पाटकी, पोलीस दलाचे जनसंपर्क अधिकारी प्रदीप द्विवेदी यांच्यासह मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक प्रशांत जांभोळकर, उप कमांडेड ए. के. वाथरे, साहाय्यक कमांडेड अमित पाटील, यांच्यासह ६० जवानांनी रक्तदान करून हा संदेश जनतेपर्यंत पोहोचवला.

# नगाजी महाराजांची पुण्यतिथी साजरी

**बेला :** संत नगाजी महाराज यांची पुण्यतिथी दरवर्षीप्रमाणे यंदाही नाभिक समाज बांधवांच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली. पुण्यतिथी प्रित्यर्थ भोयर मंगल कार्यालयात आयोजित स्नेहभोजनाचा असंख्य भक्तांनी लाभ घेतला. यशस्वीतेसाठी नाभिक मंडळाचे अध्यक्ष जगदीश निंबाळकर, उपाध्यक्ष मयूर पिस्तुलकर, सचिव रजत चौधरी, लीलाधर पिस्तुलकर राजू व चेतन पिस्तुलकर, पांडुरंग अतकर, बंडूजी पानबुडे, दीपक पिस्तूलकर, संदीप पिस्तूलकर, विनोद पिस्तूलकर, वैभव पानबुडे, प्रफुल निंबाळकर व अनेक कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

# हिंगणा विधानसभा क्षेत्र तयारीची वरिष्ट अधिकाऱ्यांकडून पाहणी

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २४ :

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 करीता 50-हिंगणा विधानसभा मतदार संघातील तयारीची आज दुपारी वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून पाहणी करण्यात आली.

आज दुपारी 12.30 वाजता निवडणूक खर्चा संबंधात भारतिय निवडणूक आयोग यांनी नियुक्त केलेले निवडणूक खर्च निरीक्षक नोडल अधिकारी खर्च सनियंत्रण देवरंजन मिश्रा, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकारी सिमा नन्होरे, जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांनी तहसिल कार्यालय, हिंगणा येथील नामनिर्देशन कक्ष, नियंत्रण कक्ष, ऋळ, श्ळ, रळ कक्ष, उप कोषागार कार्यालय येथील खचार्बाबतचे सनियंत्रण कक्ष तसेच रळ वाडी या पाईट नाका येथे भेट दिली.

मा. निवडणूक खर्च निरीक्षक यांनी सर्व पथक प्रमुख तसेच पथकास, मा. निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचना व निदेशांचे सतर्क राहून तंतोतंत पालन करण्याबाबत सूचना दिल्या. यावेळी हिंगणा विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी व उपविभागीय अधिकारी आकाश अवतारे 50- हिंगणा विधानसभा मतदारसंघ तसेच सहा. निवडणूक निर्णय अधिकारी व तहसीलदार सचिन कुमावत, उपस्थित होते.

# प्रबोधनकार ठाकरे विद्यालय मैदानी खेळात अव्वल

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २४ :

दत्तवाडीतील प्रबोधनकार ठाकरे स्मृती माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी आंतर शालेय आट्यापाट्या, अॅथलेटिक्स स्पर्धेत व आट्यापाट्या फेडरेशन ऑफ इंडिया स्पर्धेत अव्वल स्थान पटकाविले.

आट्यापाट्या फेडरेशन ऑफ इंडिया तर्फे आयोजित राज्यस्तरीय आट्यापाट्या स्पर्धा १८ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर रोजी शेगाव येथे आयोजित केलेली होती. त्यामध्ये शाळेतील विद्यार्थीनी माही शिरपूरकर, खुशबू धुर्वे तसेच विद्यार्थी हर्ष लिल्हारे यांनी भाग घेतला होता. यामधून माही शिरपूरकर हिची निवड आट्यापाट्यामध्ये राष्ट्रीय स्तरासाठी झाली आहे. आट्यापाट्याची राष्ट्रीय स्पर्धा ८ नोव्हेंबर ते ११ नोव्हेंबर या कालावधीत तामिळनाडू येथे होणार आहे.



धनवटे नॅशनल कॉलेज,नागपूर येथे १८ ऑक्टोबर रोजी झालेल्या सामन्यात प्रबोधनकार ठाकरे विद्यालयाची १७ वर्षा खालील मुले,मुली व १४ वषार्खालील मुले,मुलींच्या गटामध्ये प्रतिस्पर्धीर्ला नमवीत जिल्हा क्रीडा कार्यालय तर्फे आयोजित नागपूर विभागाचा आंतरशालेय आट्यापाट्या स्पर्धेत विजय प्राप्त करून भंडारा येथे होणाऱ्या नागपूर विभागीय आट्यापाट्या स्पर्धेमध्ये प्रवेश निश्चित केलेला आहे.

जिल्हा क्रीडा संकुल चंद्रपूर येथे नागपूर विभागीय १७ वषार्खालील मुलींमध्ये अथलेटिक्स स्पर्धेमध्ये माही धूमनखेडे १०० मीटर, २०० मीटर धावण्यात, प्रेरणा काळे ४०० मीटर धावण्यात भाग घेतला. माही धूमनखेडे हीने १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत चौथा क्रमांक प्राप्त केला.

तर प्रेरणा काळे हिने ४०० मीटर धावण्यात तिसरा क्रमांक प्राप्त केला. क्रिडा शिक्षक अलोक खोकले यांचे खेळांमध्ये सदैव मार्गदर्शन व परिश्रमामुळे विद्यार्थी विद्यार्थिनींच्या परिश्रमामुळे यश प्राप्त झाल्याबद्दल शिवशक्ती शैक्षणिक संस्थेचे सचिव नारायणराव घोडखांदे,अध्यक्ष लक्ष्मीताई घोडखांदे, संचालिका मीनाक्षी घोडखांदे, मुख्याध्यापिका अर्चना डायगव्हाणे, गुरुप्रसाद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका प्रज्ञा चौधरी, तसेच दोन्ही शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व यशवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# मतदार जनजागृती अभियानाला सुरूवात

**नागपूर :** महाराष्ट्र राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने नागपूर शहरात मतदार जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांना शुभारंभ केला. मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीमधील दालनात सेल्फी स्टँडचे देखील त्यांनी लोकार्पण केले. यावेळी आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्यासह अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल, अतिरिक्त आयुक्त श्री. अजय चारठाणकर यांनी सेल्फी काढून मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले.

आगामी विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने सिस्टिमेटिक व्होटर्स एज्यूकेशन अँड इलेक्ट्रॉल पार्टीसिपेशन अर्थात स्वीप कार्यक्रमांतर्गत नागपूर महानगरपालिकेद्वारे शहरामध्ये मतदानाबाबत जनजागृती केली जात आहे. या अंतर्गत नवीन तसेच सर्व मतदारांना २० नोव्हेंबर २०२४ रोजी अवश्य मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# नागपूर, अजनी रेल्वे स्थानकांचा व्यापक पुनर्विकास सुरू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

भारतीय रेल्वे मोठ्या परिवर्तनाच्या प्रक्रियेत आहे, ज्यामध्ये प्रमुख रेल्वे स्थानकांचे पुनर्विकास केले जात आहेत, जेणेकरून पायाभूत सुविधा आधुनिक केल्या जाऊन प्रवाशांना उत्तम अनुभव मिळावा. या उपक्रमाचा भाग म्हणून, नागपूर आणि अजनी रेल्वे स्थानकांचे पुनर्विकास सुरू आहे, जे जागतिक दर्जाच्या सुविधांसह प्रादेशिक जोडणी सुधारण्यावर भर देत आहे.



नागपूर रेल्वे स्थानक पुनर्विकास प्रकल्प 17 ऑक्टोबर 2022 रोजी मॅसर्स गिरधारी लाल कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांना 487.77 कोटींच्या अंदाजित खर्चासह प्रदान करण्यात आला होता. हा प्रकल्प 36 महिन्यांच्या आत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. आतापर्यंत नागपूर स्थानकाच्या पुनर्विकासाने मोठी प्रगती केली आहे, पूर्व विंग बेसमेंटचे 70% काम पूर्ण झाले आहे, पूर्व विंग आगमन ब्लॉकचे 55% काम आणि पूर्व विंग निर्गमन ब्लॉकचे 65% काम झाले आहे. पश्चिम बाजूला, बेसमेंट पार्किंगचे 45% काम पूर्ण झाले आहे, तर प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचे 25% काम झाले आहे. पश्चिम विंग आगमन ब्लॉक आणि निर्गमन ब्लॉकचे पुढील काम विद्यमान युटिलिटीज हलवल्यानंतर सुरू होईल.

इतर विकासामध्ये उत्तर फुट ओव्हर ब्रिज (एफओबी), दक्षिण एफओबी, आणि एअर कंकर्सचे 5% काम पूर्ण झाले आहे. हेरिटेज इमारतीचे काम सुरू झाले आहे, आणि व्यासपीठ आणि छतांच्या नूतनीकरणाचे काम कंकर्स पूर्ण झाल्यानंतर सुरू होईल. तसंच, सक्युर्लेटिंग क्षेत्राची विकासाची प्रक्रिया स्टेशन इमारत पूर्ण झाल्यानंतर सुरू होईल. एकूणच, नागपूर रेल्वे स्थानक प्रकल्पाने 35% भौतिक प्रगती आणि 101.48 कोटी आर्थिक प्रगती साधली आहे.

याचबरोबर, अजनी रेल्वे स्थानक पुनर्विकास देखील प्रगतीपथावर आहे. हा प्रकल्प 21 नोव्हेंबर 2022 रोजी मॅसर्स की स्टोन इन्फ्रा बिल्ट & ग्लोब सिव्हिल प्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड (जेव्ही) यांना ?297.79 कोटींच्या खर्चासह प्रदान करण्यात आला होता, आणि 40 महिन्यांच्या आत प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. आतापर्यंत, पूर्व बाजूची स्टेशन इमारत 65% पूर्ण झाली आहे, तर टाईप क्ष क्वार्टरचे 80% काम पूर्ण झाले आहे. पश्चिम बाजूला स्टेशन इमारतीचे 20% काम पूर्ण झाले आहे, आणि कंकर्सचे 25% काम पूर्ण झाले आहे. स्टेशनच्या पुनर्विकासासाठी मध्य रेल्वेने अजनी स्थानकावर मोठा वाहतूक आणि विद्युत ब्लॉक घेतला आहे, ज्यामुळे 12 सप्टेंबर 2024 पासून 90 दिवसांसाठी अजनी स्थानकावर व्यासपीठ क्रमांक 2 आणि 3 बंद ठेवण्यात आले आहे.

उत्तर एफओबी आणि दक्षिण एफओबीचे 20% काम पूर्ण झाले आहे, तर सेंट्रल एफओबी आणि छताचे 8% काम झाले आहे. प्लॅटफॉर्मचे नूतनीकरण कंकर्स सुरू झाल्यानंतरच सुरू होईल. सक्युर्लेटिंग क्षेत्राचा विकास प्रलंबित आहे, कारण प्रकल्प नागपूर महानगरपालिकेकडून (एनएमसी) झाडे कापण्याची परवानगी मिळण्याची वाट पाहत आहे. अजनी प्रकल्पाने 40% भौतिक प्रगती आणि 59.36 कोटी आर्थिक प्रगती साधली आहे.

नागपूर आणि अजनी स्थानकांच्या पुनर्विकासामुळे अत्याधुनिक सुविधा, प्रवाशांसाठी सुधारित सेवा आणि उत्तम जोडणी मिळेल, ज्यामुळे या प्रदेशाच्या आर्थिक विकासात मोठा हातभार लागेल. दोन्ही प्रकल्प स्थिर गतीने पुढे जात आहेत आणि पूर्ण झाल्यानंतर प्रवाशांना आधुनिक, जागतिक दजार्चा प्रवास अनुभव प्रदान करतील.

# मुख्याधिकारी संदीप बोरकर यांनी स्वीकारला कार्यभार

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २४ :

महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुका बघता वाडी नगरपरिषद चे मुख्याधिकारी मुख्याधिकारी डॉ. विजय देशमुख यांचे स्थानांतरण नागपूर मनपाच्या उपायुक्तपदी करण्यात आल्याने रिक्त जागेवर कामठी नगरपरिषदचे मुख्याधिकारी संदीप बोरकर यांची अस्थायी स्वरूपात वाडी मुख्याधिकारी पदी नियुक्ती करण्यात आली आहे.



बुधवार २३ ऑक्टोबर रोजी संदीप बोरकर यांनी वाडी नगर परिषद कार्यालयात उपस्थित राहून वाडी मुख्याधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला.

वाडी न.प.चे उपमुख्याधिकारी गौरव गाडगे तथा अन्य अधिकारी,कर्मचारी यांनी नवनियुक्त मुख्याधिकारी संदीप बोरकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. संदीप बोरकर कामठी सह वाडी न.प.चा कार्यभार पाहतील.

# स्टुडंट इंग्लिश लँग्वेज असोसिएशन कार्यक्रमाचा अहवाल सादर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

आर.एस.मुण्डले धरमपेठ आर्ट्स आणि कॉमर्स कॉलेजच्या इंग्रजी विभागाने विद्यार्थी इंग्रजी भाषा संघटनाचा कार्यक्रम आयोजित केला. हा कार्यक्रम सकाळी ९ वाजता बार. शेषराव वानखेडे कॉलेजच्या इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ.अजीत जाचक प्रमुख अतिथी, महाविद्यालयाचे प्राचार्य मोहन नगराळे आणि उपप्राचार्या डॉ. मंजुश्री सरदेशपांडे यांच्या प्रमुख उपस्थित दीपप्रज्वलनाने सुरू झाला. विद्यार्थ्यांची अध्यक्ष अनन्या पांडे यांनी प्रमुख अतिथींचं स्वागत शाल, नारळ आणि फुलांचे गुच्छ देऊन केले.

इंग्रजी विभाग प्रमुख आणि कार्यक्रमाच्या संयोजिका डॉ. मंजुश्री सरदेशपांडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. जागतिक संस्कृतीची ओळख होण्यास मदत करणाऱ्या इंग्रजी भाषेच्या महत्त्वावर भर दिला आणि सर्जनशील लेखनात सहभागी होण्यासाठी सर्वांना प्रोत्साहित केले. रएछअ विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्जनशीलतेला वाव देणारे उत्कृष्ट व्यासपीठ आहे, असेही त्यांनी सांगितले.

यानंतर बी.ए. प्रथम वषार्तील विद्यार्थ्यांनी, संवधिनी चहांदे, तनिष्क गजभिये आणि मुबाशीर अहमद यांनी "वी रॉल ओव्हरकम" हे गीत सादर केले, ज्याने सकारात्मक आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण केले. मिस आरुषी वाळगावकर आणि मिसेस निर्देशिनी गजभिये लिखित आणि दिग्दर्शित "द लँग्वेज अल्केमी" नावाची एक नाटिका विद्यार्थ्यांनी सादर केली. या नाटकाने साध्या भाषेचे महत्त्व आणि सर्जनशील विचार मांडण्याचे सामर्थ्य दर्शवले. यानंतर विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी स्वरचित लेखांचे व कवितांचे वाचन केले 'हितवाद' वृत्तपत्राच्या "यूथ झोन" आणि "मिडल स्पेस" विभागांमध्ये पूर्वी प्रकाशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या रचनांचा एक विशेष प्रदर्शन सुद्धा मांडण्यात आला. या प्रदर्शनाने सर्वांना सर्जनशीलतेत निरंतर योगदान देण्यासाठी प्रेरणा दिली. डॉ. अजीत जाचक यांनी भाषण देऊन उपस्थितांना लेखनातील सुसंगती आणि क्रम याचे महत्त्व सांगितले. त्यांनी प्रेरणादायी विचार सामायिक केले आणि शिव खेरा यांचे "विनर्स नेव्हर क्विट अँड क्विटर्स नेव्हर विन" हे वाक्य उद्धृत केले. त्यांनी प्रेम या विषयावर एक हिंदी कविता सादर केली, जी उपस्थितांना मंत्रमुग्ध करून गेली.

कार्यक्रमाचे संचालन लवीना केशवानी यांनी केले, ज्यांनी कार्यक्रमाचे सुरळीत संचालन केले. मागील वर्षाच्या उपक्रमांचे प्रदर्शन आणि इंग्रजी विभागाच्या इतर सर्जनशील कामांचे प्रदर्शन यानंतर करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. हुमेंद्र खांडेकर यांनी आभार मान डोलावलीले, ज्यात त्यांनी मान्यवर, सहभागी आणि आयोजकांचे आभार मानले. इंग्रजी विभागाच्या इतर शिक्षकांनी देखील हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खूप परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली असून यशस्वीपणे कार्यक्रम पार पडला.

